रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १३२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## मुलीवर अत्याचार; बापाला अटक

**नवी मुंबई :** बेलापूर भागात राहणाऱ्या एका ३० वर्षीय व्यक्तीने आपल्या १३ वर्षीय सावत्र मुलीचे लैंगिक शोषण केल्याची घटना उघडकीस आली आहे. एनआरआय पोलिसांनी या सावत्र पित्याच्या विरोधात लैंगिक शोषण केल्याप्रकरणी पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या घटनेतील आरोपी हा तक्रारदार महिलेचा दुसरा पती आहे. मागील पाच ते सहा महिन्यांपासून सावत्र पित्याकडून पीडित मुलीचे लैंगिक शोषण सुरू होते. अखेर मुलीने आपल्या आईला याबाबतची माहिती दिली.






## गर्दी जमविण्यासाठी सरकारचा अट्टहास

# बहिणींच्या जीवावर

**माणगावमध्ये भीषण अपघात**
**बस ५० फुट दरीत कोसळली**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याचा तिसऱ्या टप्प्यातील शुभारंभ बुधवारी (दि.९) रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात घेण्यात आला. लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमासाठी गर्दी जमवण्याचा महायुती सरकारचा अट्टाहास महिलांच्या जीवावर बेतला असून रायगड जिल्ह्यातील माणगावमध्ये एसटी बसला भीषण अपघात झाला आहे. चालकाचे नियंत्रण सुटून एसटी बस ५० फूट खोल दरीमध्ये कोसळली. ही बस म्हसळा येथून माणगावकडे येत होती. या अपघातात ८ महिला जखमी झाल्या असून एकीची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

माणगावमधील धनसे क्रीडांगणावर होणाऱ्या लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमाला गर्दी जमवण्यासाठी एसटी महामंडळाच्या हजारो बसेस रायगड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये महिलांना घेऊन येत होत्या. माणगाव तालुक्यातील मांजरोणे येथील रानवडे खुर्द गावातील महिलांना नेण्यासाठी एसटी बस पाठवण्यात आली होती. या बसमधून जवळपास २९ ते ३० महिला माणगाव येथे निघाल्या होत्या. मांजरोणे घाटामध्ये एका अवघड वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस कठडा तोडून ५० फूट खोल दरीमध्ये कोसळली. दरम्यान,

पान २ वर

## मुख्यमंत्र्यांनी केली रखडपट्टी



**। माणगाव । सलीम शेख ।**

माणगावमधील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या कार्यक्रमाला महायुती सरकारने बोलवले खरे, पण तब्बल पाच तास कार्यक्रम उशिराने सुरु झाल्याने रायगड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींची चांगलीच रखडपट्टी झाली.

जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून पहाटे निघालेल्या बहिणींना मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम आटोपून घर गाठण्यासाठी रात्र होईल, हे लक्षात येताच काही बहिणींनी कार्यक्रम सोडून जाणे पसंत केले. तर काहींनी सरकारच्या नियोजनाचा ग्राम्य भाषेत फडशा पडला. एकीकडे लाडक्या बहिणीची नाराजी आणि दुसरीकडे भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कार्यक्रमामध्ये दुजाभाव दिल्याने त्यांनीदेखील नाराजीची री ओढलेली पाहावयास मिळाली.

माणगावमधील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याचा हा कार्यक्रम प्रसिद्ध केलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळी ११:३० वाजता होणार होता. त्यासाठी सकाळी ९:३० वाजल्यापासूनच एसटी बसमधून जिल्ह्यातील विविध गावांतील महिलांना कार्यक्रम

पान २ वर

## अलिबागमध्ये गुंडा 'राजा'?

- **हेमंत खरसांबळे यांच्यावर जीवघेणा हल्ला**
- **पोयनाड पोलिसांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कुसुंबळेतील हेमंत खरसांबळे यांच्यावर मंगळवारी (दि.८) रात्री जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्यांच्यावर हॉकी स्टीकने वार करून गंभीर जखमी करण्यात आले. शिंदे गटातील राजा केणी यांच्या सांगण्यावरून हा हल्ला केल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला आहे. ही घटना घडून १२ तास उलटले आहेत. मात्र अद्यापही मारेकरी मोकाट असून त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास पोलीस टाळाटाळ करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या घटनेने अलिबागमध्ये शिंदे गटातील कार्यकर्त्यांची गुंडगिरी वाढली आहे.

पान २ वर

### मारण्याचा प्लॅन पोलीस ठाण्यातूनच?

शिंदे गटातील सदस्यासोबत झालेले भांडण खरसांबळे यांच्या मध्यस्थीने पोलीस ठाण्यात मिटविण्यात आले. त्यावेळी राजा केणी त्याच ठिकाणी होते. प्राणघातक हल्ला बारा वाजण्याच्या सुमारास झाल्यावर खरसांबळे यांचे कुटुंबिय पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते. त्यावेळी राजा केणीदेखील पोलीस ठाण्यामध्येच होते. त्यामुळे त्यांनीच हा प्लॅन आखला असल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला आहे.

**वेधक**

### डंपरच्या धडकेत मुलाचा मृत्यू

**मुंबई :** शौचालयात जाणाऱ्या एका नऊ वर्षांच्या मुलाला पालिकेच्या कचरा वाहून नेणाऱ्या डंपरने जबर धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. गोवंडीतील शिवाजीनगर येथे बुधवारी (दि.९) सकाळी ही घटना घडली. डंपरचालकाला त्वरित अटक करण्यात यावी, या मागणीकरिता संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले. हमीद शेख असे मृत मुलाचे नाव आहे. गोवंडीच्या गणवाडी

पान २ वर

### रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** कॉलेजला जाणाऱ्या तरुणाला रेल्वेची धडक लागल्याने झालेल्या अपघातात तरूणाचा मृत्यू झाला आहे. रितेश जयदास मुंडकर असे तरूणाचे नाव आहे. मंगळवारी (दि.८) सकाळी सातच्या सुमारास रितेश जयदास मुंडकर हा कॉलेजला जात होता. यावेळी रेल्वे ट्रॅक क्रॉस करताना पनवेलकडे जाणाऱ्या रेल्वेची धडक रितेश मुंडकर याला लागली.

## लढाऊ विमानाची लवकरच चाचणी

- **नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ सज्ज**

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या धावपट्टीवर वायुदलाच्या लढाऊ विमान उड्डाण चाचणीची जोरदार तयारी सुरू आहे. ११ ऑक्टोबर म्हणजे शुक्रवारी ही चाचणी केली जाणार आहे. चाचणी प्रत्यक्ष पाहणीसाठी मान्यवर आणि पत्रकारांना बसण्यासाठी मंडपाची सोय करण्याचे काम सुरु आहे.

सिडकोमंडळाचेव्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष विजय सिंघल यांच्याकडे सिडकोची सूत्रे हाती असताना विमानतळाचे काम प्रगतीपथावर आहे. सिडको मंडळाला तीन महत्वाचे प्रकल्प आचारसंहितेपूर्वी मार्गी लावायचे होते. या तीन प्रकल्पांमध्ये २६ हजार महा गृहनिर्माण प्रकल्पाची सोडत, खालापूर येथील इर्शाळवाडी येथे आदिवासी बांधवांना घरांचे वाटप आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन विमानांच्या चाचण्या हे तीन प्रकल्प आहेत. धावपट्टीवरील चाचणीमध्ये हवाई दलाचे सुखोई हे विमान धावपट्टीपासून काही अंतरावर उडणार आहे. अन्य दुसऱ्या विमानाचे प्रत्यक्ष विमानतळाच्या धावपट्टीवर विमान उतरले जाणार आहे.

## तळोजात २५ लाखांचे अंमली पदार्थ जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या पथकाने तळोजा परिसरातील एकटपाडा येथील एका इमारतीमध्ये धाड घालून मंगळवारी (दि.८) दुपारी २५ लाखांचा अंमली पदार्थाच्या साठ्यासह तिघांना अटक केली. मागील अनेक महिन्यातील ही सर्वात मोठी कारवाई आहे.

अंमली पदार्थाचा काळाबाजार नवी मुंबईत फोफावला आहे. यापूर्वी पोलिसांच्या पथकाने विविध कारवाईत लाखो रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केलेत. तरीही अंमली पदार्थाचा काळाबाजार सूरुच आहे. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी उपायुक्त अमोल काळे व सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांना अंमली पदार्थाविरोधात सक्तीच्या कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संदीप

पान २ वर

## बाकावरून पडल्याने मृत्यू

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

सिमेंटच्या बाकावरून खाली पडल्याने चार वर्षीय तेजस साकेत पटेल याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली. स्वप्नपूर्ती सोसायटी, खारघर येथे नवरात्र उत्सवाला प्राची पटेल आणि त्यांचा मुलगा तेजस हे गेले होते. स्वप्नपूर्ती सोसायटीमध्ये सार्वजनिक नवरात्र उत्सव असल्याने गरबा बघण्यासाठी तेथे असलेल्या सिमेंटच्या बाकावर खेळत असताना

पान २ वर




## मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचा फटका

# सरकारची योजना, प्रवाशांचे हाल

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी सन्मान कार्यक्रम माणगाव येथे बुधवारी घेण्यात आला. या कार्यक्रमात महिलांना पाचारण करण्यात आले. त्यासाठी रायगडमधून २५० बसेस पाठविण्यात आल्या. अचानक एसटी बसेस फेऱ्या रद्द केल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. नियमीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी जाण्यासाठी बसेस उपलब्ध न झाल्याने सरकारच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला.

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, माणगाव, रोहा, महाड, श्रीवर्धन, मुरूड, रोहा असे आठ बस आगार असून १९ स्थानके आहेत. जिल्ह्याती ३८० हून एसटी बसेस आहेत. दिवसाला एक लाखाहून अधिक प्रवास एसटीतून करतात. एसटीला त्यातून सुमारे ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. परंतु बुधवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी हजारो महिलांना बोलावण्यात आले.

या कार्यक्रमाला येणाऱ्या महिलांच्या सेवेसाठी एसटी महामंडळाकडून बसेस मागविण्यात आल्या.

रायगड विभागातून २५० बसेस पाठविण्यात आल्या. जिल्ह्यात एसटी बसचा तुटवडा असताना या कार्यक्रमाला अडीचशे

पान २ वर

**रायगडच्या एसटी बसवर दृष्टीक्षेप**

| एकूण बसेस | कार्यक्रमाला गेलेल्या गाड्या | रद्द फेऱ्या |
|---|---|---|
| ३८० | २५० | ३०० |

### मोजक्याच बसचा आधार

अलिबाग एसटी बस आगारातील ५२ एसटी बसेस पैकी ३५ बसेस माणगावच्या कार्यक्रमाला पाठविण्यात आल्या. त्यामुळे रोहा, पेण, पनवेल, मुरूड, रेवदंडा मार्गावरील काही फेऱ्या रद्द करण्याची वेळ आगार व्यवस्थापकांवर आली. शिल्लक असलेल्या बसपैकी आठ साध्या व उर्वरित शिवशाही बसेसच्या भरवशावर प्रवाशांना सेवा देण्याची वेळ आली. त्यामुळे अलिबाग स्थानकात बस नसल्याने प्रवाशांनी नाराजीही व्यक्त केली.



# ‘क्लब फूट’ असलेल्या जुळ्यांना वाचविण्यात डॉक्टरांना यश

**। पनवेल । वार्ताहर ।**

**खारघरच्या मदरहूड हॉस्पिटल्सने अकाली जन्मलेल्या (२९ आठवडे) जुळ्या बाळांना टॅलिप्स इक्विनोव्हारस म्हणजेच मक्लब फूटफ ही अस्थिव्यंगातील जन्म जात व्याधी आढळून आली. या प्रकरणात डॉक्टरांनी प्रसंगावधान राखत या जुळ्या बाळांवर यशस्वी उपचार केले.**

पनवेल येथे राहणाऱ्या जोडप्याला १२ वर्षांनंतर पहिल्यांदाच गर्भधारणा झाली. मात्र गर्भधारणेच्या २९ व्या आठवड्यात वॉटर ब्रेक झाल्यामुळे अकाली प्रसूती करण्यात आली. खारघरच्या मदरहूड हॉस्पिटलमधील नवजात शिशु आणि बालरोग तज्ज्ञ प्रमुख डॉ. अनिश पिल्लई यांना पनवेलमधील प्रसूतीतज्ज्ञांचा तातडीने फोन आला. त्यानंतर डॉ. अमित घावडे यांच्या नेतृत्वाखाली टीम अवघ्या ३० मिनिटांत पनवेलच्या रुग्णालयात पोहोचली. ट्रान्सपोर्ट टीमदेखील याठिकाणी वेळीच दाखल झाली व जुळ्या बाळांना सुखरुप ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याची प्रतिक्रिया डॉ. पिल्लई यांनी व्यक्त केली. जुळ्या बाळांना विशेष नवजात रुग्णवाहिकेत नेण्यात आले आणि जन्मानंतर अवघ्या एक तासाभरातच मदरहूड हॉस्पिटलच्या नवजात अतिदक्षता विभागात पोहोचविण्यात आले.

दोन्ही बाळांना कृत्रिम श्वासोच्छवासाची आवश्यकता होती. या बाळांना स्थिर होण्यास आणि श्वासोच्छवास सुरळीत होण्यास जवळजवळ एक आठवडा लागला. कांगारू मदर केअर आणि ऑरोगॅस्ट्रिक ट्यूब फीड्स बॉन्डिंगला तसेच बाळांचे वजन वाढवण्यासाठी विशेष काळजी घेण्यात आली. बाळ स्थिर झाल्यावर आणि कृत्रिम श्वासोच्छवास बंद झाल्यावर बाल अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. चिंतन दोशी यांनी क्लबफूटची तपासणी केली. क्लबफूट हा एक दुर्मिळ अस्थीव्यंग असून १,००० मुलांपैकी १ ते २ मुलांमध्ये आढळून येतो. गर्भातील मर्यादित जागा आणि हाडे आणि स्नायूंच्या विकासात येणारे अडथळे तसेच विकृतीमुळे ही परिस्थिती उद्भवते.

जरी कारण अनेकदा अज्ञात राहिले असले तरी,वेळीच निदान झाल्यास परिणामांमध्ये प्रभावी उपचार करता येतात. बाळाला घरी सोडण्यापूर्वी एनआयसीयूमध्ये पहिले प्लास्टर कास्ट लावण्यात आले होते. डॉ. दोशी यांनी सांगितले की, आधुनिक तंत्राचा वापर करून करण्यात आलेल्या या कास्टिंगला बाळांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होईपर्यंत आम्ही अशाप्रकारचे कास्टिंग सुरु ठेवले. प्लास्टर कास्टींगनंतर यावर किरकोळ शस्त्रक्रिया करण्यात आली. या प्रक्रियेनंतर, फिजिओथेरपीसह तीन महिन्यांसाठी विशेष शूज वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यशस्वी उपचारामुळे बाळाला भविष्यात पुढील ऑपरेशन्स किंवा कास्टिंगची गरज भासणार नाही याची खात्री झाली. साधारण एक वर्षापर्यंत ही फिजिओथेरपी सुरू राहील आणि काही महिन्यांतच बाळांचे पाय सामान्य बाळांप्रमाणे दिसून लागतील, तोपर्यंत विशेष व्यायाम आणि शूजचा. वापर करणे आवश्यक आहे. त्यानंतर ही मुलं चालू तसेच पळूदेखील शकतात असे डॉ. दोशी म्हणाले.

# खारेपाटात पाणीटंचाई

**। अलिबाग । वार्ताहर ।**



तालुक्यातील खारेपाटातील गावांना ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. डावली-रांजणखार, रेवस, सारळ, मिळकतखार, बोडणी या गावात नळाला आठवड्यातून एक-दोनदाच पाणी येते, तेही पुरेसे नसल्याने महिलांना आतापासूनच पायपीट करावी लागत आहे. गावातील पिण्याच्या पाण्याचे नैसर्गिक स्रोत खारट झाले आहेत. पर्यायी व्यवस्था नसल्याने पिण्यासाठी विकतचे पाणी घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

समुद्रालगत असल्याने येथील विहिरींना खारे पाणी येत आहे. भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार, भूगर्भातील पाणी झपाट्याने खारट होत आहे. त्यामुळे येथील विहिरींमधील पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. आतापर्यंत पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधींचा खर्च करण्यात आला; परंतु या योजना कुचकामी ठरल्या आहेत. त्यामुळे पाणीटंचाईचा फटका इथल्या नागरिकांना बसतो आहे. खारेपाटातील गावांना अनेक वर्षांपासून रेवस झोन एक आणि रेवस झोन दोन या दोन स्वतंत्र नळपाणी योजनांच्या माध्यमातून पुरवठा केला जातो; मात्र ही गावे योजनेच्या शेवटच्या टोकावर असल्याने या गावांपर्यंत पाणी पोहोचतच नाही. त्यामुळे मार्चपासूनच गावांना टंचाईच्या तीव्र झळा लागायला सुरुवात होते. अधूनमधून टँकर पाठवून प्रशासनातर्फे गावांची तहान भागवण्याचा प्रयत्न केला जातो. पावसाळा सुरू झाला की टँकरने होणारा पाणीपुरवठा बंद होतो. धो धो पाऊस पडूनही या भागातील गावांना भर पावसात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. सर्व गावे खाडीच्या किनारी असल्याने तेथील विहिरी, तळी, बोअरवेल यांना खारे पाणी लागते. ते पिण्यायोग्य नसल्याने विकतचे पाणी घेतल्याशिवाय पर्याय नसतो. सध्या १५ लिटरच्या बरणीला २० रुपये मोजावे लागतात. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

खारेपाटातील गावांत पाणीटंचाई भेडसावते आहे. त्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यांची वणवण सुरू आहे. पावसाळ्याचा हंगाम असल्याने सरकारकडून टँकर उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. पाण्याच्या शोधात घरातील कामे तशीच राहतात. आता भातकापणीचा हंगाम सुरू होणार आहे. महिला कापणीला जातील की पाणी शोधायला, हा प्रश्नच आह, असे प्रकाश पाटील म्हणाले.

# बेवारस वाहनांची ओळख पटवण्याचे आवाहन

**। पनवेल । वार्ताहर ।**

सानपाडा पोलीस ठाणे यांच्या पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यात जप्त असलेली वाहने तळोजा पोलीस स्टेशन आवारात ठेवण्यात आली आहेत. त्यात मोटार सायकली स्कुटर , रिक्षा बरेच दिवसा पासून उभ्या असून या वाहनांच्या मालकाचा शोध घेणे व लिलाव प्रक्रिया पूर्ण आवश्यक असल्याने मूळ मालकास कागदपत्रासह सानपाडा पोलीस ठाणे येथे ७ दिवसात हजर राहण्यास व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सानपाडा पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधण्यात यावा. अशी माहिती सानपाडा पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी दिली आहे.

सानपाडा पोलीस ठाणे ठाण्याच्या हद्दीत विविध कारणास्तव प्राप्त झालेली ०३ दुचाकी वाहने, १ थ्री व्हीलर एकूण ०४ बेवारस वाहने सानपाडा पोलीस ठाणे आहेत. सदर वाहनांच्या मूळ मालकांनी सात दिवसांच्या आत आपली वाहने कागदपत्रे दाखवून या बातमी सोबत दिलेल्या यादीतील आपल्या वाहनांची ओळख पटवून ती घेऊन जावी असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सानपाडा पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी केले.

# अखंड गडसंवर्धन मोहिमेस प्रारंभ

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात गेली दोन वर्ष अविरतपणे गड संवर्धन करणाऱ्या स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेच्या शिलेदारांनी गडदेवता अन्साईमातेला नतमस्तक होऊन संवर्धनाचे शस्त्रपूजन करत गडस्वच्छता मोहिमेस नवरात्री उत्सवाचे औचित्य साधून प्रारंभ केला आहे.



नवरात्री उत्सवात दुर्गामातेचा जागर सुरू असताना. स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेच्या शिलेदारांना वेध लागले ते किल्ले सुरगडाची संवर्धन मोहिम चालु करण्याचे. नवरात्री उत्सवातील ९ दिवस हे आपल्या हिंदू संस्कृतीत अतिषय पवित्र मानले जातात. आणि या दिवसात केलेल्या संकल्पांचीपूर्ती थेट आई जगदंबा पूर्ण करून घेते असे समजले जाते त्यामुळे येथील स्थानिक सुरगड संस्थेच्या माध्यमातून गड संवर्धन मोहिम राबवण्यात आली. किल्ले सुरगडाच्या शिलेदारांनी आजपर्यंत बत्तीस मोहिम गडाची स्वच्छ्ता आणि संवर्धन करण्यासाठी राबविल्या असून तेहतीसव्या मोहिमेस प्रारंभ केला तर २६ शिलेदारांनी आपला सहभाग नोंदवत जय भवानी जय शिवराय जयघोष करीत स्वच्छता आणि संवर्धनास सुरुवात केली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अजय भोसले, मयुर कापसे, मंदार पार्टे, किशोर सावरकर, सुयोग धामणसे, योगेश गुजर, सुरज भिसे, नितेश कोंडे, विशाल पवार, रोशन जाधव, लवकेश जाधव, साहील जाधव, रितेश भोसले, अथर्व कापसे, पंकज सावरकर, विलास सुर्वे, मयुर मालुसरे, मनीष धामणसे, विराज तेलंगे, ललित पवार, श्रीयोग देशमुख, सुरेश पार्टे, सिद्धेश शेलार, अरविंद भिलारे, महेंद्र पार्टेसह शिलेदार उपस्थित होते.

स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेची तेहतीसवी मोहिम अशाच काही नवीन संकल्पासहित पार पडली. या मोहिममध्ये अन्साई माता मंदिर परिसर चौथरा स्वच्छ करून तटबंदीवरील पावसाळ्यात ढासळलेले दगड, चिरे यांचे संवर्धन करत व्यवस्थित लावण्याचं काम करण्यात आले. ते काम झाल्यानंतर देवीचं आणि शस्त्राचं पूजन करण्यात आलं.

पूजन झाल्यानंतर शिलेदारांनी सामुदायिक आरती करून गडसंवर्धन कार्यासाठी बळ दे अशी मनोभावे प्रार्थना देवीकडे केली. याचबरोबर पुढील मोहिम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्षांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर उपस्थित शिलेदारांना प्रसाद वाटप करून या मोहिमेची सांगता करण्यात आली.

# डोंबिवलीत नमो रमो नवरात्रौत्सवाचे आयोजन

**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

डोंबिवलीचे आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी नमो रमो नवरात्रीचे आयोजन ३ ते १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत सावळाराम महाराज क्रीडा संकुल, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व येथे केले आहे.

अतिशय भक्तिभावाने हिंदू संस्कृतीप्रमाणे श्री अंबेमातेची प्रतिष्ठापना केली गेली. दररोज सकाळ व संध्याकाळ विधीवत पूजा आरती करून महिषासुर मर्दिनीचा गजर करून देवीला नैवेद्य वाढून आवाहन केलं जातं आणि रात्री भव्य मंडपात देवीसमोर गरबा खेळला जातो. केवळ कल्याण डोंबिवलीच नाही तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल रायगड, पालघर तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून गरबा खेळण्यासाठी पारंपारिक वेशभूषेत गरबा प्रेमी अवघी तरुणाई या ‘‘नमो रमो नवरात्रीत’’ उत्साहात सहभागी होतात. यावर्षी संपूर्ण वातानुकूलित ७० हजार स्क्वेअर फुट जागेमध्ये सर्वात मोठ्या १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती करण्यात आली आहे. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस उत्सव रंगतदार करण्यास येणार आहे. सोबत ख्यातनाम गरबा गायक निलेश गढवी यांची साथ त्यांना लाभणार आहे.

## पान १ वरून

### डंपरच्या धडकेत मुलाचा मृत्यू

परिसरात राहणारा हमीद शौचालयात जाण्याकरिता मार्ग ओलांडत असताना अचानक डम्पिंग ग्राऊंडमध्ये कचरा खाली करून येणाऱ्या भरधाव डंपरने त्याला जोरात धडक दिली. त्यामुळे हमीदचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

या अपघाताची माहिती मिळताच संतप्त स्थानिक नागरिकांनी डंपरची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. नंतर आपला मोर्चा मानखुर्द-घाटकोपर मार्गावर वळवून रास्ता-रोको आंदोलन केले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. शिवाजीनगर पोलिसांना याबाबत माहिती मिळताच ते फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संतप्त जमावाची समजूत काढून वाहतूक पूर्ववत केली. मतीउर रेहमान तय्यब हुसेन सावंत (वय ३१) या डंपरचालकाला त्वरित अटक करण्यात आली असून पुढील चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### तळोजात २५ लाखांचे अंमली पदार्थ जप्त

सहाय्यक पोलीस निरिक्षक निलेश धुमाळ, श्रीकांत नायडु यांच्या पथकाला तळोजातील एका इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अविनाश काळदाते यांच्या पथकासोबत संयुक्त कारवाई करण्यासाठी एकटपाडा परिसरातील आय.जी. रेसीडेन्सी या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक २०६ मध्ये मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता पोलीसांनी धाड घातली.

यावेळी एक नायजेरीयन व्यक्तीसह दोन पनवेलच्या दोन व्यक्तींना अंमली पदार्थासह पोलिसांनी ताब्यात घेतले. या धाडसत्रात पोलिसांना सव्वालाख रुपयांची मेफेड्रॉन पावडरसह, २१ लाखांचे कोकेन असे १२७ ग्रॅम अंमलीपदार्थ सापडले. या टोळीच्या मुख्यसूत्रधाराचा शोध पोलीस घेत आहेत

### सरकारची योजना, प्रवाशांचे हाल

बसेस पाठविल्याने जिल्ह्यातील अलिबागसह अनेक आगारात बसेसचा तुटवडा निर्माण झाला. बुधवारी सकाळी शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह कर्मचारी व अन्य प्रवाशांचे हाल झाले. एसटी बसच्या तीनशेहून अधिक फेऱ्या रद्द झाल्याने अनेक गावे, वाड्यांमधील प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. अनेक स्थानकात तासनतास बसची वाट पहाण्याची वेळ प्रवाशांवर आली. काही प्रवाशांनी मिळेल त्या वाहनाचा अधार घेत निश्‍चितस्थळी जाण्याचा प्रयत्न केला. संध्याकाळी देखील परतीच्या मार्गाव जाणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. अलिबाग पनवेल मार्गावर जाणाऱ्या प्रवाशांना विना थांबा बसचा अधार घ्यावा लागला. एसटी बसचा तुटवडा असल्याने शिल्लक असलेल्या बसच्या मदतीने स्थानकातील व्यवस्थापनाने प्रवाशांना सेवा देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात फारसे यश आले नाही. याबाबत विभाग नियंत्रक यांच्याशी संपर्क साधला असता, तो संपर्क होऊ शकला नाही.

### बहिणींच्या जीवावर

या अपघातात ८ महिला जखमी झाल्या आहेत. त्यामधील एका महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती देण्यात आली आहे. जखमी महिलांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### मुख्यमंत्र्यांनी केली रखडपट्टी

ठिकाणी आणण्यात आले. हा कार्यक्रम माणगावपासून मोर्बा रोड मार्गावर जवळपास दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या दिघी-पुणे राज्य मार्गावरील मोर्बा गावाजवळील निळगूण फाटा येथील अल्ताफदादा धनसे यांच्या भव्य मैदानावर होता. पार्किंगची व्यवस्था ज्या-ज्या ठिकाणी करण्यात आली होती. ती ठिकाणे वाहनांनी भरल्याने अन्य वाहने जागा मिळेल त्या ठिकाणी उभी करण्यात आली. त्यामुळे अनेक महिलांना एक किलोमीटरचे अंतर पायपीट करून कार्यक्रम ठिकाणी धापा टाकत यावे लागले. या कार्यक्रमास सकाळी ९:३० वाजल्यापासून लाडक्या बहिणींना बोलावून त्यांना सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत त्यांची रखडपट्टी झाली.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात या कार्यक्रमाची वेळ दुपारी तीन वाजताची होती. २ वाजून ४० मिनिटांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यक्रम ठिकाणी आगमन झाले. प्रत्यक्ष कार्यक्रम २ वाजून ४५ मिनिटांनी सुरु झाला. त्यानंतर पुढे चार वाजता हा कार्यक्रम संपला. हेलिकॉप्टर व वाहनांमधून आलेले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह सारे मंत्री, नेते मंडळी हे ऐशोआरामात आपल्या पुढील प्रवासाला निघाले. कार्यक्रम संपल्यावर पुन्हा मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींना आपण कोणत्या बसमधून आलो होतो. याची वाट बघत ताटकळत उभे राहावे लागले. त्यातच कार्यक्रम सुरु असताना पावसाचे आगमन झाले. कार्यक्रम संपल्यावर पाऊस पडत असल्याने महिलांची घरी जाण्यासाठी धावाधाव झाली.

या कार्यक्रमाच्या प्रचारासाठी माणगाव बाजारपेठेत व मोर्बा रोड मार्गावर ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या कमानी, लावलेले बॅनर्स, होर्डिंग्स यावर राज्यसभेचे खा.धैर्यशील पाटील यांचा फोटो नसल्याने रायगड जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांनी चक्क नाराजी दर्शवली. या कार्यक्रमास उपस्थित असलेले भाजप युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी पत्रकारांसमक्ष नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आम्हाला वाटले आमचे लोक येतील, परंतु ते आले नाहीत. आम्हाला या कार्यक्रमांतून आयोजकांनी पूर्णपणे डावलले. तसेच माणगाव शहरात सकाळपासूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी आम्हाला या कार्यक्रमाची साधी माहिती दिली नाही व निमंत्रणही दिले नसल्याने नाराजी व्यक्त केली.

### बाकावरून पडल्याने मृत्यू

त्याचा तोल गेला. तो डोक्यावर पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागला. त्याच्या डोक्यातून आणि कानातून रक्तस्त्राव झाला. यावेळी त्याला मैत्री हॉस्पिटल, खारघर, सेक्टर ५ येथे नेण्यात आले. त्यानंतर त्याला एमजीएम हॉस्पिटल बेलापूर येथे नेण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### गुंडा ‘राजा’?

ही गुंडगिरी रोखण्यास रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यशस्वी ठरतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

खरसांबळे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, राजा केणी यांच्या समर्थकाचा संदीप पाटील यांच्यासोबत वाद झाला होता. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, वाद विकोपाला जाऊ नये, यासाठी खरसांबळे यांनी मध्यस्थीची भूमिका घेऊन वाद मिटवला. त्यानंतर ते पोयनाड पोलीस ठाण्यातून त्यांच्या कुसंबळे येथील घरी दुचाकीवरून निघाले. श्रीगावजवळ सदगुरू हॉलजवळ आल्यावर झाडांच्या फांद्या रस्त्यावर आडव्या टाकलेल्या होत्या. त्यावेळी खरसांबळे यांनी त्यांच्या गाडीचा वेग कमी केला. दरम्यान भूषण पाटील, संजय पाटील, चेतन वावेकर व इतर काही मंडळींनी हॉकी स्टीकचा जीवघेणा हल्ला खरसांबळे यांच्यावर केला. यामध्ये त्यांना गंभीर दुखापत झाली.

रस्त्याच्या बाजूला असलेल्या गवतामध्ये ते बेशुध्द अवस्थेत पडले. तसेच त्यांच्या गाडीचेदेखील नुकसान झाल्याचे दिसून आले. त्याचवेळी त्यांच्या मागून त्यांचा भाचा संदीप त्यांच्या चारचाकी गाडीतून कुटुंबियांसमवेत येत असताना त्यांच्या गाडीवरही गावगुडांनी हल्ला केला. त्यामध्ये चारचाकी गाडीचे नुकसान झाले. यावेळी त्यांच्या सोबत संदीप पाटील यांची आई, पत्नी व दहा वर्षाचा मुलगा गाडीत होता. सुदैवाने ते बचावले. याप्रकरणी पोयनाड पोलिसांना कळविण्यात आले. परंतु पोलिसांनी याबाबत गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला आहे. रात्रीच्यावेळी झालेल्या हल्ल्याची साधी तक्रारही त्यांनी घेतली नाही. पोलिसांच्या या भूमिकेबाबत खरसांबळे यांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. राजा केणीच्या सांगण्यावरून हा हल्ला केला केला असल्याचे ते म्हणाले. या गुंडगिरीमुळे परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न ही मंडळी करीत असल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.

**कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांची बघ्याची भुमिका**

**हेमंत खरसांबळे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्यावर त्यांच्या नातेवाईकांनी पोयनाड पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. तरीदेखील त्याठिकाणी तात्काळ पोलीस पाठविले नाही. पोलीस ठाण्यात गेल्यावर माहिती देऊनही मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला नाही. कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप खरसांबळे यांच्या नातेवाईकांनी केला आहे.**

# ‘सर्वधर्मीयांसाठी अंत्यविधीची व्यवस्था करा’

**। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।**

उलवे नोड हा नवी मुंबई, उरण आणि पनवेलला जोडला गेलेला परिसर आहे. याठिकाणी स्मार्ट मेगा सिटीचे आयोजन सिडकोमार्फत करण्यात आले असले तरी येथील सोयीसुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत आहे. याच अडचणींचा सामना सर्वधर्मीय बांधवांना करावा लागत आहे. यासाठीच एआयएमआयएमचे विद्यार्थी संघटनेचे प्रदेश अध्यक्ष कुणाल खरात आणि विद्यार्थी आघाडीचे महाराष्ट्र महासचिव तथा कोकण विभाग प्रभारी हाजी शाहनवाज खान यांनी मुंबई येथील मंत्रालयात झालेल्या मीटिंगमध्ये हे मुद्दे समोर आणून तत्काळ सिडकोला निर्देश देण्याची मागणी केली आहे.



उलवेमधील हिंदू, मुस्लिम, बौध्द आणि ख्रिश्‍चन रहिवाशांना घरात अथवा नातलगांचे मयत झाल्यास नेरूळ सेक्टर चार या ठिकाणी अंत्यवधीसाठी मृतदेह घेऊन जावे लागते. हिंदू लोकांना उलवेमध्ये स्मशानभूमी उपलब्ध असली तरी ती ब्रिटीशकालीन स्मशानभूमी आहे. तिथे कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. त्यामुळे या ठिकाणी हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्‍चन बांधवांसाठी अंत्यविधीचे क्रियाकर्म करण्यासाठी सुविधायुक्त स्मशानभूमी ही नेरूळ येथेच आहे. त्यामुळे अशा धर्तीवर सिडकोमर्फत उलवेमध्ये हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्‍चन बांधवांसाठी स्मशानभूमी तसेच कब्रस्तान लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

उलवे परिसरात असंख्य नागरिक हे बाहेरून राहायला आले आहेत. या ठिकाणी रहिवास करणाऱ्या सर्वधर्मियांना प्रार्थनास्थळेही उपलब्ध नाहीत. मुस्लिम बांधवांना उलव्यात मशिद नसल्याने नमाज पढण्यासाठी नेरूळमध्ये जावे लागते. तिच परिस्थिती ख्रिश्‍चन बांधवांचीही आहे. त्यांना चर्चमध्ये प्रार्थना करण्यासाठी नेरूळ-सिवूडस या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे सिडकोने हिंदूंच्या मंदिरासाठी, मुस्लिमांच्या मशिदीसाठी आणि ख्रिश्‍चन बांधवांच्या चर्चसाठी तसेच बुद्ध धर्मियांच्या बुध्द विहारासाठी स्वतंत्ररित्या भूखंड उपलब्ध करून द्यावेत अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

# उरणमध्ये एनएमएमटी चालू करण्याची मागणी



**। उरण । वार्ताहर ।**

उरणमध्ये एनएमएमटीची सेवा बंद आहे. त्यामुळे नवी मुंबईमध्ये प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार, आबालवृद्धांची प्रवासाची अडचण झाली आहे. एनएमएमटी बस सेवा बंद झाल्याने खाजगी वाहनांकडून लुटालूट चालू आहे. शिवाय वेळ व श्रम अधिक खर्च होत आहे. नागरिकांना कामावर तसेच कामावरून घरी पोहोचण्यास विलंब होत आहे. त्यामुळे उरण शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी तसेच मॉर्निंग कट्टाचे पदाधिकारी व उरणचे नागरिक या सर्वांनी महानगरपालिका नवी मुंबईचे आयुक्त कैलास शिंदे यांची भेट घेतली. त्यांच्याकडे उरणमध्ये एनएमएमटी चालू करण्याची मागणी केली.

एनएमएमटीची बस सेवा चालू व्हावी या संदर्भात निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात उरणच्या ३०० नागरिकांनी सह्यांची मोहीम करून पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन स्वीकारून प्रवाशांच्या समस्या लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिकाचे आयुक्त कैलास शिंदे यांनी लवकरात लवकर एनएमएमटीची बस सेवा सुरू होईल असे आश्‍वासन कार्यकर्त्यांना दिले.



# ट्रेलरला अपघात!

**। सुकेळी । वार्ताहर ।**

महामार्गावर सुकेळी गावाच्या हद्दीमध्ये जिंदाल हॉस्पिटलच्या समोर वडखळ कोलाडच्या दिशेने कॉईल घेऊन जाणाऱ्या ट्रेलर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे ट्रेलर रस्त्यावरून खाली उतरुन बाजूला असलेल्या खड्ड्यामध्ये पलटी होऊन हा अपघात घडला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात बुधवारी (दि.९) सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबतीत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार वडखळ बाजुकडुन पॉस्को कंपनी माणगाव येथे कॉईल घेऊन जाणारा ट्रेलर क्रं. एम.एच.४२ बी. एक्स.९९८९ सुकेळी गावाच्या हद्दीमध्ये जिंदाल हॉस्पिटलच्या समोर आल्यानंतर ट्रेलर चालकाचे आपल्या गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी रस्त्यावरुन खाली उतरली व बाजुला असलेल्या खड्ड्यामध्ये अर्धवट स्थितीत पलटी झाली.

या अपघातात गाडीचे किरकोळ नुकसान झाले असून ट्रेलर चालकाने मात्र तेथून पळ काढला. या अपघाताची माहित मिळताच वाकण टॅबच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक गितांजली जगताप यांनी आपल्या कर्मचारी वर्गासह घटनास्थळी जाऊन अपघाताची प्रत्यक्षात पाहणी करुन वाहतूक सुरळीत राहण्यासाठी तसेच ट्रेलर क्रेनच्या सहाय्याने बाजूला करण्यासाठी प्रयत्न केले.

दरम्यान या घटनेची माहिती नागोठणे पोलीस यांना दिली असून पुढील तपास नागोठणे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी करीत आहेत.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
STATE DISASTER MANAGEMENT AUTHORITY
MAHARASHTRA
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
सन २०२३ पासून सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केल्याने सततच्या पावसामुळे सन २०२२ पासूनच्या नुकसानग्रस्त २६ लाख ५० हजार शेतकऱ्यांना रुपये १,५६१ कोटींची मदत देण्यात आली.
मदतीसाठी यापूर्वीची २ हेक्टरची मर्यादा वाढवून ती आता ३ हेक्टर करण्यात आली आहे.
सन २०२२ पासून आतापर्यंत सततचा पाऊस, दुष्काळ, पूर, अतिवृष्टी, गारपीट या नैसर्गिक आपत्तींमध्ये नुकसान झालेल्या राज्यातील १ कोटी ६९ लाख शेतकऱ्यांना एकूण १६ हजार ९८७ कोटी रु. मदत देण्यात आली.
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना यापूर्वी दिल्या जाणाऱ्या मदतीच्या रकमेत भरघोस वाढ करण्यात आली आहे
जिरायती पिकांसाठी – रु. १३,६०० प्रति हेक्टर (पूर्वीची रु. ८,५०० प्रति हेक्टर)
बागायती पिकांसाठी – रु. २७,००० प्रति हेक्टर (पूर्वीची रु.१७,००० प्रति हेक्टर)
बहुवार्षिक (फळपिके) पिकांसाठी – रु. ३६,००० प्रति हेक्टर (पूर्वीची रु.२२,५०० प्रति हेक्टर)
“ जनतेच्या सुरक्षिततेसाठी आम्ही वचनबद्ध आहोत. विभागाकडून दुष्काळग्रस्त तसेच अतिवृष्टी झालेल्या भागांना तत्काळ अधिकाधिक मदत दिली जात आहे. तसेच केंद्र शासनाकडूनही सहकार्य मिळावे यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. ”
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन
आपत्तीसाठी मदत क्रमांक : १०७०/१०७७/११२
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
अनिल पाटील
मंत्री,
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना
दहा हजार रुपयांपर्यंत
स्टायपेंड मिळणार
योजनेसाठी ४ लाख ७९ हजार ९१८ युवांनी अर्ज केले आहेत.
१ लाख ६९ हजार ९८८ उमेदवारांची निवड झाली असून यापैकी ८२ हजार २८१ युवक आणि युवती प्रत्यक्ष रुजू झाले.
इच्छुक उमेदवार व आस्थापनांनी
https://rojgar.mahaswayam.gov.in किंवा
https://cmykpy.mahaswayam.gov.in यावर नोंदणी करावी.
आपलं सरकार
लाडकं सरकार
अजित पवार
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
/MahaDGIPR
mahasamvad.in
MAHARASHTRADGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# .. तर भाजप देशद्रोही

जम्मू-काश्मीर विधानसभेमध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीला ४९ जागांसह बहुमत मिळाले आहे. ओमर अब्दुल्ला मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला असून राज्यात दहा वर्षांनी लोकनियुक्त सरकार स्थापन होईल. मात्र केंद्रातून भाजप सरकारने आणि त्यांचे एजंट म्हणून नायब राज्यपालांनी तिथे दादागिरी चालूच ठेवली तर मात्र परिस्थिती पुन्हा चिघळेल. जनतेने राजकीय पक्षांना एक संधी दिली आहे. त्यासाठी तिने आपले आक्षेप विसरून मतदानात उत्साहाने भाग घेतला. मतदान व मोजणीदरम्यान एकही हिंसाचाराचा प्रकार घडला नाही. याचे श्रेय जितके पोलिस व लष्कराला आहे तितकेच स्थानिक जनतेलाही आहे. ३७०वे कलम रद्द करण्याच्या निर्णयाला आजही काश्मिरी जनतेचा विरोध आहे. मात्र तिने तो बाजूला सारून एका पक्षाला निर्णायक मत दिले. आता त्या पक्षाने व दिल्लीतील राज्यकर्त्यांनी त्याचे चीज करायला हवे. दरम्यान, राज्यात शांतता प्रस्थापित झाली याचे श्रेय घेण्याचा कितीही प्रयत्न मोदी सरकारने केला तरी ते अर्धसत्य आहे. एकतर राज्यात प्रचंड संख्येने लष्कर तैनात आहे. शिवाय दुसरे म्हणजे सर्व विरोधी पक्ष व संघटना यांच्या नेत्यांचा केंद्रातील नेत्यांनी गेल्या पाच वर्षात अतोनात छळ केला आह. ३७० वे कलम रद्द झाल्यावर अब्दुल्ला पितापुत्र आणि मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती इत्यादींना प्रदीर्घ काळ नजरकैदेत ठेवले होते. नंतर या विविध नेत्यांना काँग्रेससह एकत्र येऊन गट बैठका घेतल्यावर त्यांना मोदींनी दहशतवादी ठरवले. आपण तेवढे देशद्रोही, इतर सर्व देशविरोधी हा भाजप नेत्यांचा दृष्टिकोन देशाला खड्ड्यात घालणारा आहे. मुफ्ती महंमद सैद यांच्या पीडीपीबरोबर भाजप युती करू शकतो, पण तीच युती काँग्रेसने केली ती मात्र गद्दार हा बालिश पण घातक प्रचार भाजपने आता तरी बंद करावा.

## छुप्या भाजपवाल्यांचा सफाया

काश्मिरात तोडफोडीच्या राजकारणाला वाव मिळू नये, इतपत बंदोबस्त मतदारांनी केला आहे. भाजपने हरियाणाप्रमाणेच येथेही असंख्य अपक्ष तसेच छोट्या गटांच्या डमी उमेदवारांना उभे करून नॅशनल कॉन्फरन्सच्या मार्गात खोडे घालण्याचा प्रयत्न केला, रशीद इंजिनिअर हे लोकसभेला बारामुल्ला मतदारसंघात ओमर अब्दुल्लांचा पराभव करून निवडून आले होते. इंजिनिअर यांचा जमाते इस्लामीशी संबंध असून ते दहशतवादी कारवायांशी संबंध असल्याच्या आरोपावरून तुरुंगातच होते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांची सुटका करण्यात आली. तोवर त्यांना दहशतवादी ठरवणाऱ्या केंद्रीय तपास यंत्रणांनी त्यांच्या जामिनाला विरोध केला नाही. ते लगोलग प्रचारात उतरले व त्यांनी मुख्यतः नॅशनल कॉन्फरन्सला लक्ष्य केले. हे सगळे उपद्व्याप ते भाजपच्या मदतीसाठी आणि त्या पक्षाच्या इशाऱ्यावर करीत असल्याचे स्पष्ट होते. पण ज्या मतदारांनी इंजिनिअर तुरुंगात असूनही त्यांना चार महिन्यांपूर्वी लोकसभेत निवडून दिले त्यांनीच यावेळी त्यांना पुरती धूळ चारली. त्यांच्या पक्षाच्या ३६ पैकी ३१ जणांची अनामत रक्कम जप्त झाली. केवळ एक उमेदवार कसाबसा निवडून आला. भाजपने याच रीतीने मधल्या काळात अपना पार्टीच्या बुखारीला पुढे आणण्याचा प्रयत्न केला होता. तोही दारुणरीत्या आपटला. महत्वाचे म्हणजे दहशतवादी गटांशी संबंध असलेल्या व फुटिरतावादी भूमिका घेणारे अनेक जण यावेळी अपक्ष म्हणून उभे होते. हे भाजपच्या सोईचे असल्याने त्यांनाही विनाअटकाव निवडणूक लढू दिले गेले. पण हे सर्व दणकून आपटले. भाजपच्या विरोधात नॅशनल कॉन्फरन्स हाच टिकाव धरू शकेल असे गृहित धरून मतदारांनी त्यांना स्पष्ट कौल दिला. मेहबुबा मुफ्तींच्या पीडीपीला काही जागा मिळाल्या असत्या तर भाजपला फोडाफोडीचे चाळे करायला वाव मिळाला असता. पण मेहबुबांच्या कन्या इल्तिजांसह अनेक जण पराभूत झाले. त्या पक्षाला अवघ्या तीन जागा मिळाल्या. २०१४ मध्ये पीडीपीला २८ जागा होत्या व भाजपशी आघाडी करून तो सरकार चालवत होता. नंतर तेच बरखास्त करून ३७० वे कलम रद्द करण्याचा निर्णय भाजपने पुढे रेटला होता.

## सरकारला अडवू नका

एक विशेष उल्लेख करावा लागेल तो डाव्या कम्युनिस्टांच्या विजयाचा. कुलगाम मतदारसंघात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महम्मद तारिगामी हे सलग पाचव्यांदा निवडून आले आहेत. त्यांनी जमाते इस्लामीच्या उमेदवाराचा पराभव केला. जनतेने किती विचारपूर्वक मतदान केले आहे याचा हा पुरावा आहे. भाजपच्या जागा गेल्या वेळच्या २५ वरून यावेळी वाढून २९ वर गेल्या. मात्र त्यात मोदी-शाह यांच्या चलाखीचा भाग अधिक आहे. मधल्या काळात मतदारसंघाची फेररचना करून हिंदूंची बहुसंख्या असलेल्या जम्मूमधील सात जागा वाढवण्यात आल्या. त्यामुळे या जागा वाढलेल्या दिसत आहेत. पण काश्मीर खोऱ्यात १९ जागा लढवून भाजपला एकही जागा जिंकता आली नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे नौशेरा येथून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना हे पराभूत झाले. निवडणुकीच्या जागावाटपात भाजपमध्ये मोठा असंतोष उफाळला होता व बंडखोरी झाली होती. आता केवळ हिंदूंचा पक्ष म्हणून लोकांनी त्यांना मतदान केले असले तरी भाजपमध्ये सर्व काही आलबेल नाही. निवडणुकीच्या तोंडावर पहाडी लोकांना अनुसूचित जमातींमध्ये सामील करण्याचा निर्णय घेऊन आदिवासी राखीव जागा जिंकण्याचा भाजपचा प्रयत्न होता. पण तेथे एकही जागा त्यांना मिळवता आली नाही. दलितांसाठीच्या राखीव जागा मात्र भाजपने जिंकल्या. नॅशनल कॉन्फरन्सने जम्मूमध्ये सहा जागा जिंकल्या. म्हणजे तो पक्ष पूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व करतो. भाजपला मात्र तसा दावा करता येणार नाही. काश्मीरच्या नायब राज्यपालांना निवडणुकीपूर्वी केलेल्या दुरुस्तीद्वारे केंद्राने भरमसाठ अधिकार देऊन ठेवले आहेत. पोलिस, तुरुंग, गुप्तचर यंत्रणा इत्यादी त्यांच्या अखत्यारीत राहील अशी व्यवस्था केली गेली आहे. भ्रष्टाचारविरोधी कारवाई विभागही त्यांच्यापाशी आहे. शिवाय, राज्यपालांना पाच सदस्य विधानसभेवर नियुक्त करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे. त्यामुळे सरकार कोणाचेही आले तरी त्याची नाकेबंदी करण्याची जय्यत तयारी झालेली आहे. मात्र त्यांचा वापर करण्याचा नतद्रष्टपणा झालाच तर भाजपलाच देशद्रोही म्हणावे लागेल.

---

**विचार**

# लक्षवेधी अर्थ घडामोडींचे वास्तव

***सरता आठवडा काहीशा विशेष आणि वेगळ्या बातम्यांमुळे अर्थजगतातले वास्तव दाखवणाऱ्या ठरल्या. त्यापैकी पहिली महत्वाची बातमी म्हणजे 'एक्स' हा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म प्रचंड तोट्यात असल्याचे समोर आले. दरम्यान, म्युच्युअल फंडात छोट्या शहरातून गुंतवणुकीचा ओघ वाढत असल्याचे समोर आले. त्याच वेळी महागड्या घरांची विक्री वाढत असून स्वस्त घरांची विक्री कमी होत असल्याचे स्पष्ट झाले.***



**महेश देशपांडे**

ट्विटर म्हणून ओळखले जाणारे 'एक्स' आता अडचणीत आले आहे. टेस्ला आणि स्पेसएक्ससारख्या बड्या कंपन्यांचे मालक इलॉन मस्क यांनी ते विकत घेण्यासाठी गुंतवलेले पैसे बुडत आहेत. 'एक्स'चे मूल्य आता ७५ टक्क्यांहून अधिक खाली गेले आहे. यामुळे इलॉन मस्कच नव्हे, तर त्याचे गुंतवणूकदारही चिंतेत आहेत. ही घसरण कायम राहिल्यास त्यांना लवकरच कठोर निर्णय घेणे भाग पडू शकते. 'फिडेलिटी ब्लू चिप ग्रोथ फंड'च्या अहवालानुसार, मस्क यांनी सुमारे ४४ अब्ज डॉलर्समध्ये ट्विटर विकत घेतले होते. दरम्यान, फिडेलिटीने त्यात सुमारे १९.६ दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक केली होती; परंतु, जुलै २०२४ पर्यंत, फिडेलिटी शेअर्सचे मूल्य ५.५ दशलक्ष डॉलर इतके कमी केले जाईल. अहवालानुसार, 'एक्स'चे बाजारमूल्य फक्त ९.४ अब्ज डॉलर्स आहे. अशा प्रकारे जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांना सुमारे ३४ अब्ज डॉलर्सचे मोठे नुकसान झाले आहे. मस्क यांच्यासाठी हा मोठा आर्थिक धक्का आहे. महसूल निम्म्यावर आला आहे. जाहिरातीमुळे मिळणारे उत्पन्नही मोठ्या प्रमाणात घटत आहे 'एक्स' सार्वजनिकपणे व्यापार करणारी कंपनी नाही. अशा परिस्थितीत त्याचे बाजारमूल्य शोधणे फार कठीण आहे; पण त्याचे गुंतवणूकदार बाजारमूल्याची माहिती देत राहतात. 'फिडेलिटी'ने 'एक्स' चे मूल्य सतत कमी केले आहे. या वेळी तिने त्याचे बाजारमूल्य ७८.७ टक्क्यांनी कमी केले आहे. यापूर्वी जानेवारी आणि मार्चमध्येही त्यांनी इलॉन मस्क यांच्या या कंपनीचे मूल्य कमी केले होते. 'एक्स'च्या एकूण उत्पन्नात जाहिरातीमधून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा सुमारे ७५ टक्के आहे; पण त्यात सातत्याने घट होत आहे. खर्च कमी करण्यासाठी कंपनीने आपले सॅन फ्रान्सिस्कोमधील कार्यालय आधीच बंद केले आहे. याशिवाय अनेक कर्मचारीही कमी केले आहेत. 'एक्स'च्या भवितव्याबद्दल कर्मचारीही साशंक आहेत. 'फिडेलिटी'व्यतिरिक्त बिल एकमन आणि डिडी कॉम्बहेदेखील त्याचे गुंतवणूकदार आहेत. डिडीवर मानवी तस्करीसारखे गंभीर आरोप आहेत. अशा स्थितीत 'एक्स'च्या भवितव्याबाबत अनेक प्रश्न निमर्ण झाले आहेत. ते बंद होण्याची भीतीही लोक व्यक्त करत आहेत.

दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करणाऱ्या छोट्या शहरांमधून नवीन गुंतवणूकदारांच्या संख्येत जोरदार वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात, एप्रिल-ऑगस्ट २०२४ दरम्यान, म्युच्युअल फंड उद्योगाने २.३ कोटी नवीन गुंतवणूकदार (फोलिओ क्रमांक) जोडले आहेत. त्यापैकी ५० टक्क्यांहून अधिक गुंतवणूकदार हे छोट्या शहरांतील आहेत. 'झेरोधा फंड हाऊस'ने म्युच्युअल फंडात गुंतवणुकीसाठी लहान शहरांमधील गुंतवणूकदारांच्या वाढत्या संख्येबाबत एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, एप्रिल ते ऑगस्ट दरम्यान म्युच्युअल फंड उद्योगाने २.३ कोटी नवीन गुंतवणूकदार जोडले आहेत. त्यापैकी १.२३ कोटी किंवा ५३ टक्के गुंतवणूकदार देशातील टॉप ३० शहरांव्यतिरिक्त इतर शहरांमधून आले आहेत. म्हणजेच पहिल्या ३० शहरांमधून कमी नवीन गुंतवणूकदार जोडले गेले आहेत. लहान शहरांमध्ये मे ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत एकूण फोलिओच्या संख्येत एक कोटींनी वाढ झाली आहे. अहवालानुसार, म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्या छोट्या शहरांमधून नवीन गुंतवणूकदारांची संख्या वाढली असली, तरी म्युच्युअल फंड उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तांमधून छोट्या शहरांचा वाटा केवळ १९ टक्के आहे. याचा अर्थ लहान शहरांमधून जास्त लोक गुंतवणूक करत असले तरी गुंतवणुकीचा सरासरी आकार मोठ्या शहरांपेक्षा कमी आहे.

छोट्या शहरांमधून किरकोळ विभागातील गुंतवणुकीचा सरासरी दर १.१३ लाख रुपये आहे तर टॉप ३० आणि इतर शहरांसह रिटेल विभागातील गुंतवणुकीचा सरासरी आकार २.०४ लाख रुपये आहे. ऑगस्ट २०२४ पर्यंत म्युच्युअल फंड उद्योगातील एकूण 'एसआयपी' खात्यातील ५४ टक्के योगदान छोट्या शहरांमधून आले आहे. छोट्या शहरांमध्ये अधिक एसआयपी खाती उघडणे हे चांगले लक्षण मानले जात आहे. एप्रिल ते ऑगस्टपर्यंत इंडेक्स फंडांमध्ये १८.७ टक्के 'एसआयपी' खाती उघडण्यात आली. छोट्या शहरांमध्ये उघडलेली ७९ टक्के 'एसआयपी' खाती वाढ किंवा इक्विटी योजनांमध्ये आहेत. 'झेरोधा फंड हाऊस'च्या अहवालानुसार, स्मार्टफोन ॲप्स, डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म, डिजिटल पेमेंट सिस्टीम आणि म्युच्युअल फंड इंडस्ट्रीद्वारे केलेल्या प्रयत्नांमुळे लहान शहरांमधून येणाऱ्या ५० टक्के नवीन गुंतवणूकदारांनी थेट योजनांद्वारे गुंतवणूक केली आहे. एका आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ मध्ये लहान शहरांमधून येणाऱ्या गुंतवणूकदारांची एकूण संख्या ८.२९ कोटी होती. ती ऑगस्ट २०२४ मध्ये ९.५२ कोटी झाली आहे, म्हणजेच १.२३ कोटी नवीन गुंतवणूकदार सामील झाले आहेत. थेट योजनेद्वारे गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या एप्रिल २०२४ मध्ये २.९६ कोटी होती. ती ऑगस्टमध्ये वाढून ३.६ कोटी झाली. म्हणजेच ६४ लाख नवीन गुंतवणूकदारांनी थेट योजनेद्वारे गुंतवणूक केली आहे.

आणखी एक दखलपात्र वृत्त म्हणजे लक्झरी आणि महागड्या घरांची विक्री आणि मागणी वाढल्यामुळे २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये जुलै ते सप्टेंबर या कालावधीत विक्रमी ८७,१०८ घरे विकली गेली, जी पाच टक्के अधिक आहे. चालू वर्षातील कोणत्याही तिमाहीतील हा सर्वाधिक विक्रीचा आकडा आहे. २०२४ च्या पहिल्या नऊ महिन्यांमध्ये एकूण दोन लाख ६०,३४९ घरांची विक्री झाली आहे. बंगळुरूमध्ये घरांच्या किमती सर्वाधिक वाढल्या आहेत. तिथे दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. हैदराबाद आणि मुंबईमध्ये किमती सहा टक्क्यांनी वाढल्या आहेत. 'नाइट फ्रँक इंडिया'ने जुलै ते सप्टेंबर या तिमाहीसाठी कार्यालय आणि निवासी बाजाराबाबत अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार एक कोटींहून अधिक किमतीच्या घरांना सर्वाधिक मागणी आहे. एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची घरे निवासी युनिट्सच्या एकूण विक्रीच्या ४६ टक्के आहेत. तिसऱ्या तिमाहीमध्ये या श्रेणीतील एकूण ४०,३२८ युनिट्सची विक्री झाली. ५० लाख ते एक कोटी रुपये किंमतीच्या घरांच्या विक्रीचा वाटा एकूण विक्रीच्या ३० टक्के आहे.

या कालावधीमध्ये २६,०११ युनिट्सची विक्री झाली तर ५० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीच्या घरांच्या विक्रीचा वाटा २४ टक्के आहे. २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ५० लाखांपेक्षा कमी किमतीच्या २०,७६९ गृहनिर्माण युनिटची विक्री झाली आहे. 'नाइट फ्रँक इंडिया'ने सांगितले की परवडणाऱ्या घरांच्या विक्रीत घट होत आहे. अहवालानुसार, ५० लाख किंवा त्यापेक्षा कमी किमतीच्या घरांची विक्री २०२३ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये २३,०२६ युनिट्सच्या तुलनेत १४ टक्क्यांनी घसरून २०,७६९ युनिट्सवर आली आहे. घरांच्या किमतीत झालेली वाढ, गृहकर्जाचे महागडे व्याजदर, मागणीत झालेली घट आणि कोरोना महामारीचा या विभागावर झालेला विपरीत परिणाम ही त्यामागील मुख्य कारणे आहेत. त्यामुळे विक्रीत घट झाली आहे. मुंबई आणि कोलकाता ही एकमेव निवासी बाजारपेठ आहे, जिथे या विभागातील विक्रीत वाढ झाली आहे. 'नाइट फ्रँक इंडिया'च्या मते, घरांच्या किमती वाढल्यामुळे या किमतीमध्ये घरे घेऊ इच्छिणाऱ्या घर खरेदीदारांना बाजारापासून दूर ठेवले जात असून या विभागात पुरवठ्याअभावी विक्रीचे प्रमाणही कमी आहे.

यामुळे महागड्या घरांची मागणी वाढत राहील. 'नाइट फ्रँक इंडिया'चे अध्यक्ष शिशिर बैजल म्हणाले की निवासी क्षेत्राच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे रिअल इस्टेट मार्केटसाठी हा उत्तम काळ ठरला आहे. एक कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत असलेल्या घरांच्या सेगमेंटमुळे विक्रीत जोरदार वाढ झाली आहे. ते म्हणाले की दिल्ली एनसीआर ही एकमेव बाजारपेठ घसरत आहे; मात्र गेल्या १३ तिमाहींमध्ये एक कोटींहून अधिक किमतीच्या घरांच्या विक्रीत सातत्याने वाढ होत आहे. बैजल यांच्या मते, स्थिर आर्थिक दृष्टिकोन आणि व्याजदर कपातीच्या शक्यतेमुळे मागणी मजबूत राहण्याची शक्यता आहे.

---

# मानसिक आरोग्यभान आणि आपण

**हे असले विचार करायची काय हिला गरज? डॉक्टरांसमोर बसलेल्या २३ वर्षाच्या इलाचे वडील तावातावाने बोलत होते. इला नुकतीच इंजिनियर झाली होती. आता तिने जॉब शोधणे अपेक्षित होते. पण हल्ली गेल्या ३-४ महिन्यात तिचे वागणे खूपच बदलले होते. ती गप्प-गप्प झाली होती. तिला अचानक रडू येत असे. रात्री झोप लागत नसे. ती खूप मानसिक तणावातून जात होती. मनात आत्महत्येचे विचार येत होते. आणि मुख्य म्हणजे याला कोणतेही ठोस कारण नव्हते.**

**डॉ.अनिल डोंगरे**

इलाला "डिप्रेशन" या आजाराची लक्षणे असल्याचे सांगितल्यावर तिचे वडील चांगलेच खवळले. "हे कसलं डिप्रेशन? हिला कसलं टेन्शनच नाही. सगळं काही चांगलं आहे !! डिप्रेशन येईलच कसं?"

"मेंदूतील रासायनिक द्रव्यांच्या बदलामुळे डिप्रेशनच नाही, तर अनेक मानसिक आजार होऊ शकतात. कोणतेही कारण नसताना देखील!" डॉक्टर म्हणाले. १० ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक मानसिक आरोग्यदिन' म्हणून साजरा केला जातो. १९९२ साली जागतिक आरोग्य संघटनेने हा दिवस मानसिक आरोग्यदिन म्हणून जाहीर केला. १९९४ सालापासून हा दिवस साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. बऱ्याच देशांमध्ये हा संपूर्ण आठवडा 'मानसिक आरोग्य सप्ताह'म्हणून साजरा केला जातो व मानसिक आरोग्य विषयक प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवले जातात. जागतिक आरोग्य संघटना दरवर्षी या दिनाला एका संकल्पनेशी(थीम) जोडत असते. या वर्षीची संकल्पना आहे "कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य" (Mental Health at Work Place). एकंदरीत मानसिक आरोग्य म्हणजे काय याचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे हे खूप निकडीचे कार्य आपण सर्वांनी करण्याची गरज आहे. मानसिक आरोग्यासंबंधीचे कोणकोणते पैलू लोकांसमोर न्यायचे आहेत. याचा आढावा या लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वप्रथम मानसिक विकारांची प्राथमिक ओळख ही सर्वसामान्यांना होणे आवश्यक आहे. आपला समाज अजूनही अंधश्रद्धांच्या विळख्यात अडकलेला आहे. अजूनही मनोविकारग्रस्तांना भूतबाधा, करणी झाली असे समजून भगत, मांत्रिक यांच्याकडे नेले जाते. कित्येकदा अघोरी उपाय केले जातात. महाराष्ट्र सरकारने अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर २०१३ साली जादूटोणा प्रतिबंधक कायदा संमत केला. त्यानंतर हळू हळू अशा अवैज्ञानिक, अघोरी प्रकारांना कायद्याने पायबंद बसायला सुरुवात झाली आहे. पूर्वीच्या तुलनेत समाजात मानसिक आजारांबद्दल जाणीव निर्माण झालेली काहीशी दिसत असली, तरी ती अजून मोठ्या प्रमाणावर होण्याची नितांत गरज आहे. अजूनही कित्येकदा आजार खूप बळावल्यानंतरच रुग्णाला उपचारांसाठी आणले जाते. ही वस्तुस्थिती आहे. तरी या विकारांबद्दल सर्वसामान्यांमध्ये प्रबोधन होणे गरजेचे आहे. मनोरुग्णांकडे आणि मनोविकारांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन ही सुद्धा एक चिंतेची बाब आहे. मनोविकार झाला म्हणजे ती व्यक्ती 'मेंटल', 'वेडी', 'पागल' झाली असा शिक्का मारला जातो. अशा प्रकारचा कलंक कुणालाच आवडणार नाही. हा कलंक नाकारण्याचा प्रयत्न म्हणून मानसिक त्रास होत असूनही तो लपवला जातो. "मला काहीही होत नाहिये" अशी ताठर भूमिका घेऊन अनेकजण त्रास सहन करत राहतात. अशांना उपचार न केल्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबालाच भोगावे लागतात. लग्न ठरवताना वधू किंवा वराला पूर्वी मानसिक आजार होऊन गेला असेल, तरी ती माहिती समोरच्या पार्टीपासून लपवली जाते. अशामुळे बरेच विवाह नंतर धोक्यात येतात किंवा तुटतात. मानसिक आजारांकडे एक 'कलंक' म्हणून पाहण्याचा समाजाचा हा पूर्वग्रह दूषित दृष्टीकोन बदलण्याची खूप मोठी गरज आहे. वेळीच योग्य उपचार न केल्यास नैराश्यविकार किंवा इतर गंभीर मानसिक विकारांची परिणती कधी-कधी आत्महत्येचा प्रयत्न करणे यात होऊ शकते. अशा बऱ्याच घटनांमध्ये आत्महत्येचा प्रयत्न करण्यापूर्वी कित्येक दिवस आत्महत्येचे विचार व्यक्तीच्या मनात घोळत असतात. असे विचार मनात येत असतील तर कुणा हितचिंतकाशी बोलणे गरजेचे आहे. मनातील विचार मोकळेपणाने बोलले गेले व जरूर वाटल्यास समुपदेशक वा मनोविकारतज्ज्ञाची मदत घेतली गेली तर अशी दुर्घटना टळू शकते.

भारतात मानसिक आजारांवरील उपचारांची अपुरी सुविधा हाही एक मोठा गहन प्रश्न आहे. एका अंदाजानुसार भारतात सुमारे ९ ते १० हजार मनोविकारतज्ञ आहेत. त्यातले बहुसंख्य हे शहरांमधे आहेत. फक्त केरळ राज्यात लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे मनोविकारतज्ञ आहेत. उर्वरीत भारतात हे प्रमाण गरजेच्या एक चतुर्थांश इतकेच आहेत. महाराष्ट्रात शासकीय मनोरुग्णालये एकंदर चार आहेत (रत्नागिरी, पुणे, ठाणे व नागपुर) व ती सर्व स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापलेली आहेत. स्वातंत्र्यानंतर त्यात भर पडलेली नाही. मात्र बऱ्याच शासकीय जिल्हा रुग्णालयांमध्ये मनोविकारतज्ज्ञांची नियुक्ती व ओपीडी सुरू करण्यात आली आहे. पण अजूनही बहुसंख्य जिल्हा रुग्णालयांमध्ये रुग्णाला भरती करण्यासाठी खास वॉर्ड नाहीत. खाजगी मनोरुग्णालये खूप कमी आहेत व तिथे रुग्णाला दीर्घ काळ भरती करून उपचार करावयाचा असल्यास तो खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचा असतो.

मनोविकारांबद्दल अज्ञान, त्याविषयीचा पूर्वग्रह, जुनाट आजार, उपचारांचा न पेलवणारा खर्च इ. अनेक कारणांमुळे अनेक मनोरुग्णांचे उपचार बंद होतात. कधी असे रुग्ण घरांतून परागंदा होतात, रस्तोरस्ती भणंगावस्थेत फिरताना आढळतात. त्यांना उपचार करून पुन्हा त्यांच्या घरीपोचवणे, कुटुंबियांना मानसिक आधार देणे आवश्यक आहे. मुंबईतील प्रसिद्ध मनोविकारतज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी अशा भटक्या रुग्णांना उपचार करण्याचा उपक्रम राबवला आहे. व त्याबद्दल त्यांचा मॅगेसेसे पुरस्काराने सन्मान झाला आहे. पण या समस्येचे अवाढव्य स्वरूप व अशा भटक्या रुग्णांची संख्या पाहता हे एकट्या दुकट्याचे काम नव्हे असे लक्षात येते. मुलांच्या मानसिक आरोग्याच्या समस्यासुद्धा खूप महत्वाच्या पण दुर्लक्षित आहेत. महाराष्ट्रात मतिमंद मुलांसाठी पुरेशा शाळा किंवा खास वर्ग नाहीत. खरे म्हणजे मतिमंद मुलांसाठीचे खास वर्ग नेहमीच्या शाळेतच असायलाहवेत जेणेकरून ही मुले सर्वसामान्य मुलांमधे मिसळतील. त्यांच्यातला न्यूनगंड कमी होईल. असे वर्ग संलग्न केल्यामुळे त्यासाठीचा पायाभूत खर्च कमी होईल. पण याबाबतीतली पहिली समस्या म्हणजे पुरेसे प्रशिक्षित शिक्षक (स्पेशल एज्युकेटर्स) उपलब्ध नाहीत. आणि दुसरी महत्वाची बाब म्हणजे बहुसंख्य शाळांचे प्रशासन अशा खास वर्गासाठी उत्सुक नसते. मतिमंद मुले शाळेत असली तर शाळेची प्रतिमा खलावण्याची भीती यामागे असावी. मुलांच्या 'अध्ययन अक्षमते'बद्दल (लर्निंग डिसॲबीलीटी) 'तारे जमीं पर' या चित्रपटातून खूप चांगले प्रबोधन केले गेले होते. परंतु, अजूनही त्या प्रश्नाबद्दल बऱ्याच पालकांनाच नव्हे तर शिक्षकांनाही पुरेशी माहिती नसते. 'अध्ययन अक्षमते'चे निदान करण्याच्या चाचण्या आणि 'उपचारात्मक अध्यापन'(रिमेडीकल एज्युकेशन) करण्याच्या सुविधा अजूनही मोठ्या शहरांतच उपलब्ध आहेत. या सुविधा पुरवणाऱ्या प्रशिक्षित तज्ज्ञ व्यक्ती निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

समाजाच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करणारा एक मोठा राक्षस म्हणजे व्यसनाधीनता! दारू, तंबाखू, गांजा यासारख्या जुन्या व्यसनांबरोबरच एमडी, एलएसडी, कोकेन आणि इतर ड्रग्जचा समाजात शिरकाव झाला आहे आणि दुर्दैवाने तरुणाई त्याच्या विळख्यात ओढली जाते आहे. या ड्रग्जच्या बरोबरीने समाजमाध्यमांचीही पकड तरुण पिढीवर घट्ट होत चालली आहे. मोबाईलचे व्यसन तर घराघरातून सर्रास दिसत आहे. या सर्वांच्या धोक्यापासून समाजाला, विशेषत: तरुण पिढीला वाचवण्यासाठी प्रबोधनाची नितांत गरज आहे. एकंदरीत आव्हानांचा डोंगर अवाढव्य आहे. पण अखंड प्रयत्नशील राहिल्यास हळू-हळू समाजाचे मानसिक आरोग्य सकारात्मक दिशेने निश्चित वाटचाल करील अशी आशा आपण या जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने करूया.

---

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० ऑक्टोबर**

**१८६८:-** नाटककार, कवी आत्माराम मोरेश्वर पाठारे यांचा जन्म. 'मार्कंडेय' हे पौरोणिक तर 'संगीत वसंत इंदिरा','संगीत संभाजी','संगीत रणसिंह बाजी','भक्त नरहरी' इ. नाटके रचली. **१८७१:-** लेखक आणि रामदासी संप्रदाय आणि साहित्याचे अभ्यासक शंकर श्रीकृष्ण देव यांचा जन्म. **१८८७:-** अमेरिकन मिशनरी लेखक रॉयल गोल्ड वॉइल्डर यांचे निधन. त्यांनी 'सालसबेरी मैदानातील धनगर यांची गोष्ट','गवळयाच्या कन्येची गोष्ट' आदी पुस्तके लिहिली. **१८९९:-** साम्यवादी नेते, विचारवंत व लेखक कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचा जन्म. 'गांधी व्हर्सेस लेनिन',' टिटोचा युरोपविरुध्द कट','गाडगीळ आणि भारतीय लोकशाहीचे अर्थशास्त्र' आदी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली होती. पत्रकार म्हणूनही कॉ. डांगे यांनी 'इंद्रप्रकाश' दैनिकाचे उपसंपादक ते 'क्रांती' साप्ताहिकाचे संपादक असा प्रवास केला. वक्तृत्व साध्यासोप्या शब्दांचे आणि श्रोत्यांना 'मंत्रमुग्ध' करण्यापेक्षा त्यांना शहाणे करणारे असावे, असे मानणाऱ्या तात्कालिन वक्त्यांपैकी कॉ.डांगे एक श्रेष्ठ वक्ते होते. **१९००:-** अनुवादक शंकर वामन देशपांडे यांचा जन्म. लेलिन, स्टॅलिन, कार्ल मार्क्स यांच्या ग्रंथासह अनेक मार्क्सवादी विचारांच्या ग्रंथाचे मराठीत अनुवाद केले. तसेच ते कम्युनिस्ट वृत्तपत्रांचे संपादनही होते. **१९०५:-**लेखिका, स्वातंत्र्यसेनानी पार्वतीबाई शंकर ठकार यांचा जन्म. अवघ्या ४थी इयत्ता शिकलेल्या पार्वतीबाईंनी 'जागतो संयमी तिथे' ह्या पुस्तकातून स्वातंत्र्य चळवळीच्या आठवणी जागवल्यात. **१९०६:-** इतिहास विषयक लेखक प्रा. यषवंत गोसावी यांचा जन्म. 'शिवराज्याभिषेक-एक जळजळीत वास्तव', 'शिवरायांचे पराक्रमी वारसदार आणि विचारांचा मुडदा ला' अषी ग्रंथसंपदा. **१९२७:-** कवी डॉ. वसंत लक्ष्मण विंझे यांचा जन्म. ह्यांच्या कविता 'वसंत','वाङ्‌मयषोभा' आदी मासिकातून प्रसिध्द झाल्या आहेत. **१९२८:-**लेखक, प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ डॉ. अच्युत विवनाथ करेकर यांचा जन्म. ह्यांची 'बालजन्म', 'स्त्रियांचे विव','स्त्रियांच्या शस्त्रक्रिया (समत गैरसमज)' हे वैद्यकीय विषयांवरील ग्रंथ प्रसिध्द. **१९२८:-** नट, दिग्दर्शक, नाटयनिर्माते, प्रकाषक, कथा, कादंबरी लेखक गोपाळ महादेव टाकळकर यांचा जन्म. ह्यांनी 'एक दिवटी पाच बुधले' ह्या विनोदी नाटकासह 'रंगीचा हिसका' हे वगनाटय तसेच 'जगावेगळं घर', 'नकटीच्या लग्नाला','नर्तकी पराजीत' अशी नाटके लिहिलीत. **१९३५:-**लेखक डॉ. कृष्ण माधव घटाटे यांचा जन्म. ह्यांनी 'श्री गुलाबराव महाराजांची विचारसंपदा' या विषयावर पीएचडी आणि याच विषयावर विपुल प्रमाणात पुस्तके लिहिलीत. यामध्ये गुलाबराव महाराजांचे आत्मचरित्र, तसेच त्यांच्या ग्रंथाचा सारांष, त्यांचे भक्तीशास्त्र आणि स्वरुपाची पुस्तके लिहिली. **१९३७:-** साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बालसाहित्यिक, अनुवादक अनंत दत्तात्रेय भावे यांचा जन्म. दुरदर्शनच्या जमान्यात बातम्या सांगताना त्यांनी स्वत:ची अशी एक खास शैली निर्माण केली होती. त्यांच्या स्फूट लेखांचा संग्रह 'वडापाव' तसेच 'लालम लाल','चिमणे चिमणे','पटपटपूर पटपटपूर', 'अग्गड हत्ती तग्गड बंब' हे बालकाव्यसंग्रह, 'सवाई ठकसेन' हा एकांकिका संग्रह आणि 'एका पराभवाची कहानी' हा भारत चीन विषयावरील अनुवादीतग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९४१:-**बालसाहित्यिक चंद्रकांत कुंडलिक इंदुरे यांचा जन्म. 'झाशीची राणी','थोर लोकनेते' आणि 'नेताजी सुभाष' ही लहान मुलांसाठी त्यांनी पुस्तके लिहिलीत. **१९४२:-**अर्थशास्त्र विषयक नियतकालिकातून लेखन करणाऱ्या लेखिका, कामगार प्रनांच्या जाणकार प्रा. अमरजा चंद्रशेखर नेरुरकर यांचा जन्म. ह्यांनी 'अर्थशास्त्रीय मत प्रणालीचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला. **१९४६:-** दलितोध्दार, लेखक, कवी आणि पत्रकार किसन फागोजी बनसोडे यांचा जन्म. 'प्रदीप' या काव्यसंग्रहात त्यांच्या काही निवडक काव्य रचनांचा समावेष. 'संत चोखामेळा चरित्रगाथा' हा त्यांचा संषोधीत व संपादित ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची प्रचिती दर्शवितो. **१९४७:-** नाटयकथनकार भगवान धोंडूजी उरकुडे यांचा जन्म. 'मोहफूल' हे आत्मकथन त्यांचे प्रकाशि०त झाले आहे.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० ऑक्टोबर

१) श्री.सुधाकर विश्वनाथ रानवडे १०-१०-१९३६
२) श्रीम.शैलजा प्रभाकर शिंदे मु.कुरूळ, अलिबाग, १०-१०-१९३१
३)श्री.जयश्री किसन वेळे अलिबाग १०-१०-१९५०
४)श्री.नरेंद्र विठ्ठल पाडावे चेंढरे, अलिबाग १०-१०-१९४५
५)श्री.सदानंद किसान डबरी अलिबाग १०-१०-१९५२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

# ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ पेक्षा लेक शिवबाची म्हणून ओळखले जावे

## ■ स्नेहल जगताप यांचे प्रतिपादन

**। महाड । वार्ताहर ।**

**जिल्ह्यातील नव्हे तर राज्यातील महिलांना मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण म्हणून न ओळखता, लेक शिवबाची म्हणून ओळखली जावी. यासाठी जे-जे काही करता येईल यासाठी आपण स्वतः एक महिला म्हणून प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही शिवसेनेच्या (उबाठा) नेत्या स्नेहल जगताप यांनी दिली.**



रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत लेक शिवबाची हा भव्य दिव्य महिला संवाद मेळावा बी.एस. बुटाला सभागृहात पार पडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. महिलांचे सक्षमीकरण, सबलीकरण आणि बचत गटांना आर्थिक सहाय्य याबाबत माहिती देण्यात आली. बचत गटामार्फत तयार होणारे उत्पादन त्यांना उपलब्ध होणारी बाजारपेठ कशी तयार करता येईल, तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत त्याला कसे आर्थिक सहाय्य देता येईल, या बाबतची माहिती या कार्यक्रमात देण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, मेघना पवार, अश्विनी घरटकर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी हजारो महिलांनी मान्यवरांबरोबर संवाद साधत आपल्या अडीअडचणी सांगितल्या. महिलांचे सर्व प्रश्न सोडवले जातील, असा विश्वास स्नेहल जगताप यांनी महिलांना दिला. ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजनेचे १५०० रुपयां पेक्षा महिलांनी स्वतःच्या कमाईतून हक्काचे पैसे कसे मिळतील याबाबत माहिती देत महिला सक्षम होण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे जगताप यांनी सांगितले. आगामी काळात महिला बचत गटांच्या माध्यमातून पुढे येत नावलौकिक मिळवतील. यासाठी महिलांनी भविष्यातील घडामोडी ओळखून बदल केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात उपस्थित महिला वर्गाला बचतगटामधील असणाऱ्या योजनांची पुर्ण माहिती देण्यात आली. संवाद मेळायाकरिता अडीच हजार पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

# उरणमध्ये झळकले युवा सपोर्टचे बॅनर

**। पनवेल । वार्ताहर ।**

उरण विधानसभा क्षेत्रात सध्या राजकारण तापले आहे. शेतकरी कामगार पक्षाने नुकताच पदाधिकारी नियुक्ती मेळावा निमित्ताने युवाशक्तीला एकत्रित करून विधानसभा क्षेत्रात ३०० पेक्षा जास्त युवा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती भविष्यात येणाऱ्या विधानसभेत लाल बावटा फडकवण्यासाठी केली आहे.




मा.आमदार बाळाराम पाटील आणि मा.नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या मेळाव्याला तालुक्यातून दोन हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शेतकरी कामगार पक्षाकडून उरणचे उमेदवार म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे रायगडजिल्हाखजिनदारप्रितमम्हात्रे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. महाविकास आघाडीमधून आपल्यालाच तिकीट मिळेल, असा विश्वास या मेळाव्यामध्ये नेत्यांकडून व्यक्त करण्यात आला. मेळाव्यानंतर दुसऱ्याच दिवशी संपूर्ण उरण विधानसभा क्षेत्रात युवा सपोर्ट म्हणून मोठ्या प्रमाणात बॅनर झळकले. परंतु ताबडतोब दुसऱ्याच दिवशी उरण नगर परिषदेने ते काढले. अनधिकृत होर्डिंग विरुद्ध शांत राहणाऱ्या उरण नगर परिषदेने याचवेळी होर्डिंग काढण्याचा कर्तव्यदक्षपणा दाखवल्यामुळे उरणकरांमध्ये चर्चेचा विषय आहे.

# जीथं खड्डा, तिथं वृक्षारोपण

**पनवेल :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पडलेले खड्डे हे चांगल्या दर्जाच्या डांबराने बुजवावेत अन्यथा शेकापतर्फे १५ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महापालिका क्षेत्रामध्ये खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करण्यात येईल, असा इशारा शेकाप पनवेल महापालिका जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी आज पनवेल महापालिकेच्या उपायुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी त्यांच्यासोबत पनवेल शहर चिटणीस नंदकिशोर भोईर, पराग भोपी, संदेश डिंगोरकर, दि पनवेल अर्बन बँकेचे संचालक दिलीप कदम उपस्थित होते. या निवेदनात महादेव वाघमारे यांनी म्हटले आहे की, महानगरपालिका क्षेत्रातील खड्डे बुजविण्याकरिता महापालिकेने नेमलेल्या ठेकेदाराकडून चांगल्या दर्जाचे डांबर न वापरता खड्डे बुजविण्यात येत आहेत. या संदर्भात वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत. सध्या स्थितीत खांदा वसाहत, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा फेज-१ आणि फेज-२ या ठिकाणी प्रचंड प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघात होत आहेत. दुचाकीसह चारचाकी वाहनांना या खड्ड्यांमुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक वाहनांचे टायर सुद्धा फुटले आहेत. तरी सदर खड्डे बुजविण्यासाठी चांगल्या दर्जाच्या डांबराने बुजवावेत, अशी मागणी केली आहे.

# माणगावात नेत्र तपासणी शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि.०९) महेंद्र मेथा यांच्या सभागृहामध्ये नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ७९ रुग्णांची तपासणी करून ३३ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबीर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.



माणगावात गेली दोन वर्षांहुन अधिक काळापासून २९ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २ हजार ६०० हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ जनता घेत आहे. विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ. ईशा निरगुटकर, दीपाली म्हात्रे, नियती शिंदे, सायली उतेकर, कल्पेश सावंत यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले. लाभार्थ्यांनी आयोजकांचे आभार मानले.

# तीन कंपन्यांत पगारवाढीचे करार

**। उरण । प्रतिनिधी ।**

शेलघर येथील कार्यालयात तीन कंपन्यांतील कामगारांच्या पगारवाढीचे करार करण्यात आले. त्यात मे. सुरज ॲग्रो इन्फ्रा. प्रा.ली. जेएनपीटी उरण या कंपनीतील कामगारांसाठी तीन वर्षासाठी १६ हजार रुपये पगारवाढ करण्यात आली. त्याचबरोबर एक बेसिक पगार कामगारांच्या परिवारासाठी मेडिक्लेम पॉलीसीसाठी तसेच १४% बोनस देण्याचे मान्य करण्यात आले आहे. तर, तळोजा येथील सवेरा इंडिया रायडींग सिस्टीम या कंपनीतील कामगारांसाठी ९ हजार २०० रुपयंची पगारवाढ, ३ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलीसी, एक पगार बोनस व १० लाख रुपयांची टर्म इन्शुरन्स देण्याचे मान्य करण्यात आले. तिसरा करारनामा मे. किम केमिकल्स या कंपनीतील कामगारांच्या पगारवाढीसाठी करण्यात आला. या करारनाम्यानुसार कामगारांना तीन वर्षासाठी ६ हजार ५०० रुपये पगारवाढ तसेच एक ग्रॉस सॅलरी आणि प्रत्येकी ५ हजार बोनस देण्याचे मान्य करण्यात आले.



यावेळी न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कार्याध्यक्ष पी.के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील उपस्थित होते. तर, सुरज ॲग्रो कंपनीतर्फे जयेश चौहान, सुशील कुराळे तसेच कामगार प्रतिनिधी अरुण पाटील, राकेश म्हात्रे, सौकत अली, किशोर पाटील आदि उपस्थित होते. सवेरा इंडिया तळोजा या कंपनीतर्फे अजय पवार तर कामगार प्रतिनिधी संदीप म्हात्रे, आत्माराम पाटील, रोशन भोईर, महेंद्र म्हात्रे, रामलाल पासवान आदि उपस्थित होते.

किम केमिकल्स तळोजा कंपनीतर्फे महेश चंदानी व काम गारांतर्फे सुनील पाटील, विश्वास भोईर, श्रीनाथ मढवी, सुभाष म्हात्रे आदी उपस्थित होते.

# धोकादायक गतिरोधक अखेर हटवले

## ■ प्रवाशांच्या मागणीला यश, अपघाताचे संकट टळले!

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी येथे टाकलेल्या नियमबाह्य गतिरोधकांमुळे ऐन गणेशोत्सवात एका महिलेला जीव गमवावा लागला. येथील धोकादायक गतिरोधकांमुळे प्रवाशांमध्ये अपघाताची भीती कायम होती. अशा गंभीर घटनेचा विचार करत, अनेकांच्या मागणीनुसार बांधकाम विभागाकडून तालुक्यातील धोकादायक गतिरोधक काढून टाकण्यात आले आहेत.



गणेशोत्सवात भोस्ते येथे राहणाऱ्या महिला श्रीवर्धन ते वडवली प्रवासात दांडगुरी येथे गतिरोधकावर वाहन आदळल्याने पाठीमागून तोल जाऊन खाली पडल्या. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तालुक्यातील दांडगुरी, बागमांडला, हरिहरेश्वर मार्गातील रस्त्यावर उभारलेले गतिरोधक त्रासदायक असल्याची तक्रार प्रवाशी वर्गातून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने करण्यात येत होती. यामध्ये प्रवासात वाहनांचे होणारे नुकसान, त्यासोबतच होणारा शारीरिक त्रास आणि अपघाताची भीती कायम असल्याने गतिरोधक हटवण्याची मागणी वाहतूक संघटना तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून करण्यात आली.

> **अनेक वाहतूक संघटना तसेच ज्येष्ठ नागरिक यांनी गतिरोधक हटवण्याची मागणी केल्याने त्या-त्या ठिकाणचे गतिरोधक काढण्यात आले आहेत.**
> **- तुषार लुंगे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

गतिरोधकांच्या नावाखाली काही ठिकाणी उभारलेल्या टेकडांमुळे अपघात, नागरिकांची शारीरिक, तसेच वाहनांचीही हानी होत आहे. यातून गतिरोधक उभारताना कोणत्या नियमांची अंमलबजावणी केली, असाच प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः दुरवरून आलेल्या पर्यटकांना याची कल्पना नसल्याने अपघात घडत होते. हे स्पीड ब्रेकर आता काढून टाकण्यात आले आहेत.

## गौरव पोरवाल यांचा वाढदिवस साजरा

**पनवेल :** शेकापचे कामोठे कार्याध्यक्ष गौरवभाई पोरवाल यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाद्वारे संपन्न झाला. पनवेल नेरे येथे असलेल्या वृद्धाश्रमामध्ये जाऊन त्यांनी तेथील लोकांना फळे आणि कपडे वाटप केले. शेतकरी कामगार पक्षाच्या निष्ठावंत कार्यकता म्हणून त्यांनी कामोठेमध्ये प्रत्येक शाळेत जाऊन सुमारे ५० झाडे शाळेला दिली.

एक मुलगा एक झाड अशी संकल्पना राबवण्यात आली. कामोठे प्रमुख संघटक अल्पेश माने, उपाध्यक्ष सचिन झणझणे, उपाध्यक्ष नितीन पगारे व तुकाराम औटी उपस्थित होते.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा

## परभणीचे भारत माता गणेश मंडळ

**। मुंबई । वार्ताहर ।**

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु. ल. देशपांडे कला अकादमीच्यावतीने घेण्यात आलेल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चा निकाल घोषित करण्यात आला आहे. राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार भारत माता गणेश मंडळ, देवनांदरा,जि. परभणी, द्वितीय पुरस्कार जय भवानी मित्र मंडळ, ठाणे व तृतीय पुरस्कार वसुंधरा वृक्षरुपी गणेशोत्सव, लातूर यांना जाहीर झाला आहे. राज्यातील पहिला क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास पाच लाख, द्वितीय क्रमांकास दोन लाख ५० हजार आणि तृतीय क्रमांकास एक लाख इतक्या रकमेचे पारितोषिक, सन्मानाचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय उर्वरित ३३ जिल्ह्यांसाठीही जिल्हा निहाय पारितोषिक विजेते जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय पारितोषिकाचे स्वरूप रुपये २५००० प्रत्येकी, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

# तळा नगरपंचायतीत नक्की कोणाचा झाला विकास?

**। तळा । वार्ताहर ।**

स्वातंत्र्याची पंचाहत्तरी होऊनही १५ व्या विधानसभेला सामोरे जाताना साऱ्याच राजकीय पक्षांच्या प्रचाराची गाडी आजही वीज, पाणी आणि रस्त्यामध्येच अडकली. त्यामुळे ग्रामीण भागातील मतदारांवर मात्र विकास म्हणजे काय रे भाऊ, नक्की कुणाचा विकास झाला? असा प्रश्न उमेदवारालाच विचारण्याची वेळ आली आहे.

तळा नगरपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आल्यानंतर शहराचा विकास होईल, अशी स्वप्ने पाहणाऱ्या नागरिकांच्या पदरी अडीच वर्ष होऊनही निराशाच पडली आहे. तळा नगरपंचायतीने तब्बल छत्तीस लाखांचे तीन जनरेटर चौदाव्या वित्त आयोगातून खरेदी केले आहेत. पाणी पुरवठा करणाऱ्या अंबेळी पंप हाऊस, धरण पंप हाऊस आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील पाण्याची टाकी येथे हे तीन जनरेटर बसविण्यात आले आहेत. लाईट गेल्यानंतर या जनरेटरने नागरिकांना पाणी पुरवठा करता येईल, हा या मागचा उद्देश आहे. पण हे जनरेटर धूळ खात पडले आहेत. नागरिकांसाठी त्याचा काही उपयोग नाही. मग ३६ लाखांच्या जनरेटरची खरेदी नक्की कोणासाठी? स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तळा नगरपंचायतीने विशेष फंडातून शहरातील कचरा संकलन करण्यासाठी खरेदी करण्यात आलेले दोन ट्रॅक्टर धूळखात पडले आहेत. याचा उपयोग जनतेसाठी नाही, मग ही खरेदी कोणासाठी? ४ ते ५ महिन्यांपुर्वी तळा नगर पंचायतीला मिळालेली अग्निशमन गाडी शोभेची वस्तू ठरली आहे. शहरात व आजुबाजुच्या गावांमध्ये लागणाऱ्या आगीवर नियत्रंण मिळविता यावे, यासाठी ही गाडी नगरपंचायतीला देण्यात आली. मात्र यावर चालक अन्य कर्मचारी नसल्याने हा बंब धुळखात पडला आहे. भविष्यात शहरात कुठे आग लागली तर या गाडीचा काही उपयोग नाही मग, अग्निशमन गाडी खरेदी कोणासाठी? सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२१-२०२२ योजने अंतर्गत तळा नगरपंचायतीसाठी नव्वद लाख सत्तावीस हजार रुपयांची डिझेल विद्युत शवदाहिनी मंजूर करण्यात आल्यानंतर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात शवदाहिनी बसविण्यात आली आहे, परंतु गेली तीन वर्षे विजेवर चालणारी ही शवदाहिनी धूळ खात पडली आहे. त्यामुळे नगरपंचायतीने शवदाहिनी उभारण्यासाठी केलेला नव्वद लाख सत्तावीस हजार रुपये खर्चही वाया गेला आहे. ही खरेदी कोणासाठी? ५५ लाख रुपये खर्च करुन, तयार करण्यात आलेल्या तळा बाजारपेठेतील मुख्य रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत या रस्त्याची डागडुजी नेहमीच सुरू आहे, पण मलम पट्टीचाही उपयोग होत नाही.

## उमाजी खंडागळे यांना उत्कृष्ट सेवानिवृत्ती पुरस्कार प्रदान

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

पालीतील जेष्ठ नागरिक व रायगड जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी उमाजी गोविंद खंडागळे यांना देवगड अहमदनगर येथे पार पडलेल्या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातून एकमेव उत्कृष्ट सेवानिवृत्ती पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन. डी. मारणे यांच्या हस्ते हा पुरस्कार पदान करण्यात आला. यावेळी उमाजी खंडागळे यांनी पत्नी उषा उमाजी खंडागळे यांच्या समवेत पुरस्कार स्वीकारला.



रायगड जिल्हा परिषद अलिबाग व पंचायत समिती सुधागड पाली येथे कार्यरत असताना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल उमाजी खंडागळे यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना रायगड जिल्हा कर्मचारी सहकारी पतपेढी सोसायटी रायगड अलिबागचे व्हॉइस चेअरमन पदही भूषवले आहे. सर्वांशी आपुलकीचा संपर्क आहे. सर्वांना मदत करण्याच्या स्वभावामुळे त्यांचा जनमाणसात चांगला परिचय आहे. ते पालीतील ज्येष्ठ नागरिक संघटनेमध्ये प्रमुख सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

उमाजी खंडागळे यांचा पत्नी, दोन मुले व दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या विचारांना प्रेरित होऊन ते सध्या स्वाध्याय परिवारातील सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षा होत आहे.

# महिला मंडळातर्फे भोंडला नवरात्रोत्सव साजरा

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

नवरात्रोत्सव सुरू असल्याने मुरूड तालुका शिंपी समाज महिला मंडळातर्फे भोंडला उत्सवाचे सोमवारी सायंकाळी येथील शिंपी समाज हॉल मध्ये आयोजन करण्यात आले होते.समाजातील सुमारे २५ भगिनी यांचे सह छोटी मुले, मुली या मध्ये सहभागी झाल्या होत्या.

शिंपी समाज महिला मंडळ अध्यक्षा सौ शोभा उदय राऊत, सचिव सौ शिवानी सौरभ नाझरे, खजिनदार सौ सुनीता विजय करंबे यांचे मार्गदर्शनाखाली भोंडल्या चे यशस्वी आयोजन करण्यात आले.प्रारंभी हादगा,भुलाई, भोंडला या नावाने ओळखला जाणाऱ्या नवरात्रोत्सवात लोकगीते सादर करण्यात आली. मुरूड शिंपी समाजातील महिलांनी हा अनमोल ठेवा जतन करीत जेष्ठ भगिनी सौ प्रज्ञा प्रकाश सद्रे यांचे मार्गदर्शनाखाली संकलित केलेल्या भोंडल्याची सुमारे १२ भोंडला लोकगीते पूजे भोवती फेर धरून उत्साहात सादर करण्यांत आली. उपस्थित शिंपी समाज महिलांनी खिरापत देखील वाटून भोंडला श्रद्धापूर्वक आणि समूह नृत्याचा फेर धरीत साजरा केला.

**भोंडला म्हणजे काय ?**

**भोंडला हा पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात नवरात्रोत्सवात आपली संस्कृती जपणारा उत्सव आहे.महाराष्ट्रात वेगवेगळ्या रूपाने ही परंपरा महिलां कडून पाळली जात असून नव्या पिढीने ती जतन करावी अशी देखील यामागे अपेक्षा आहे. परतीच्या आणि हस्त नक्षत्राच्या पावसानंतर चांगली पिके घेऊन भोंडला साजरा करण्याची एक प्रथा देखील आहे. निसर्गाला धन्यवाद देणारा हा उत्सव मानवजातीला समृद्धी देतो अशी भावना यामागे आहे.म्हणून असे उत्सव लोप पावता कामा नये याची काळजी नव्या पिढीने देखील घेतली पाहिजे अशी धारणा सुद्धा आहे.**

## आरबीआय पतधोरण समितीच्या बैठकीत निर्णय

# आरबीआयने जाहीर केले पतधोरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेनंतर शेजारी राष्ट्र चीनच्या केंद्रीय बँकनेही व्याजदर कपात करुन अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून पैसे काढून चीनमध्ये लावण्यावर प्राधान्य देत आहेत. परिणामी भारतीय शेअर बाजारावर याचा परिणाम दिसून आला होता. दरम्यान, रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची ५१ वी बैठक ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत पार पडली. यादरम्यान रेपो दरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




दसरा-दिवाळीला आरबीआयने ग्राहकांना मोठा दिलासा दिला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सलग दहाव्यांदा रेपो रेट जाहीर केला. यावेळी रेपो रेटमध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सलग दहाव्यांदा रेपो दर ६.५ टक्के ठेवला आहे. एमपीसीमधील ६ पैकी ५ सदस्यांनी व्याजदरामध्ये बदल करण्याविरोधात मत नोंदवल्याचे आरबीआय प्रमुख शक्तिकांता दास यांनी सांगितले. आरबीआयकडून घेण्यात आलेल्या या निर्णयानुसार आता सामान्यांना किमान दिलासा मिळाला आहे. कारण, गृहकर्जाच्या टक्केवारीतही कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. असे असले तरीही वाहन आणि तत्सम इतर कर्जांमध्ये मात्र कोणतादी दिलासा मिळाला नसल्याचे स्पष्ट होत आहे. आरबीआयने याआधी २०२३ च्या फेब्रुवारीमध्ये रेपो ६.५ टक्क्यांवर आणला होता तेव्हापासून ही आकडेवारी स्थिर असल्याचे सांगण्यात येते.

मात्र, आता आरबीआयनं आपली भूमिका तटस्थ केली आहे. यावेळी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी जीडीपी वाढीच्या अंदाजाशी संबंधित आकडेवारी शेअर केली. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये पहिल्या तिमाहीत जीडीपी ७.२ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ७ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ७.४ टक्के, चौथ्या तिमाहीत ७.४ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत तो ७.३ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला.

अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हनं नुकतीच बेंचमार्क दरात ०.५ टक्क्यांची कपात केली आहे. त्याचबरोबर अन्य काही देशांच्या मध्यवर्ती बँकांनीही व्याजदरात कपात केली. परंतु आरबीआयनं असा निर्णय घेतला नाही आणि व्याजदर स्थिर ठेवले. डिसेंबरच्या रेपो दरात काही प्रमाणात शिथिलता येण्यास वाव असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे.

## रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** कॉलेजला जाणाऱ्या तरुणाला रेल्वेची धडक लागल्याने झालेल्या अपघातात तरूणाचा मृत्यू झाला आहे. रितेश जयदास मुंडकर असे तरूणाचे नाव आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. मंगळवारी (दि.८) सकाळी सातच्या सुमारास रितेश हा कॉलेजला जात होता. बंबावीपाडा रेल्वे ट्रॅकजवळ बस स्टॉपला जाणाऱ्या रस्त्यावर पनवेलच्या ट्रॅकवर मालगाडी जात होती. यावेळी उरणसाठी एक मालगाडी गेली. रेल्वे ट्रॅक क्रॉस करताना पनवेलकडे जाणाऱ्या रेल्वेची धडक रितेश मुंडकर याला लागली.

## निवडक

### शालेय साहित्याचे वाटप

**अलिबाग :** पोयनाड लायन्स क्लबचे अध्यक्ष विकास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदीप सिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.७) राजिप प्राथमिक शाळा पोयनाडच्या विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर, पुस्तकं, चित्रकला वही, रंगपेटी आदीचे वाटप करण्यात आले. यावेळी एन.आर. परमेश्वरन, प्रवीण सरनाईक, विजय गणात्रा, एसएन. मूर्ती, विजय वनगे, दिलीप गाटे, प्रदीप सिनकर, विकास पाटील, प्रगती सिनकर, सुनील काकडे, रत्नकांत सूर्यवंशी, अरविंद अग्रवाल, प्रमोद राऊत आदी उपस्थित होते.

### महिलांचा भजन कार्यक्रम

**आगरदांडा :** मुरुड शेगवाड्यातील आशिलकुमार ठाकुर यांच्या निवासस्थानी नवरात्रौत्सव निमित्त महिलांचा भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भजनात आर्यन भायदे यांच्या पखवाज वादनांनी व भजन गायक राधा पाटील, छाया भायदे, मंगल चोगले यांच्या सुश्राव्य भजनांत शेकडो पुरुष व महिला रसिकगण मंत्रमुग्ध झाले होते. तसेच, या भजनाच्या गीतांमध्ये धुंद होऊन भक्तगण आपले स्वर मिसळत होते. भजनात रंगत आणण्यासाठी पखवाज वादकांनी उत्तम साथ दिल्याने रसिकगण भारावुन गेले होते.

### सौरऊर्जा प्रकाश योजना

**उरण :** जांभूळ पाडा आदिवासी वाडीतील नागरीकांना नेहमीच अंधारातून वाट काढावी लागत असे. याकडे रायगड जिल्हा परिषद सदस्या कुंदा वैजनाथ ठाकूर यांनी लक्ष देऊन सौरऊर्जा प्रकाश योजना आणून दिवे लावण्यात आले आहेत. तसेच, या प्रकाश योजनेसाठी उरण पंचायत समिती गट विकास अधिकारी समीर वाटारकर, माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर , सामजिक कार्यकर्त्या विश्रांतीघरत, दिपक पाटील, रोशनी मोहिते यांचे देखील सहकार्य लाभल आहे.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान

**वावोशी :** उतेखोल शाळेत 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहेत. दरम्यान, २१ सप्टेंबर रोजी नगर पंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. सायली अंबुले आणि आस्मिता बडतर यांच्या उपस्थितीत मुकादम मोरे, महेंद्र मोरे, काशिराम मोरे, देवदास मोरे, दिपक गायकवाड, विठ्ठल मोरे, भगवान शिर्के, सुधीर साळवी, शैलेश मोरे, दिनेश मोरे, शरद मोरे, महेंद्र मढवी, संतोष बोडेरे, मोहन हिलम, सुरेश मोरे यांचा सन्मान करण्यात आला.

### नृत्य संस्कृतीचा अविष्कार

**चिरनेर :** रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात प्रसिद्ध असलेल्या महिलांच्या पारंपारिक नृत्याच्या संस्कृतीचा अविष्कार चिरनेर येथे पहावयला मिळाला. नवरात्र उत्सवानिमित्ताने चिरनेर गावातील अभिनव सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा मंडळ यांनी श्रीराम मंदिराच्या समोरील प्रांगणात पारंपारिक मंगळागौर नृत्याचे आयोजन केले होते. खोपोली येथील आई गावदेवी चामुंडा ग्रुपच्यावतीने हा पारंपारिक मंगळागौर नृत्याचा आविष्कार सादर करण्यात आला.

# ट्रक चालक-मालक संघटनेचे आंदोलन

**■ कंपनी व्यवस्थापनाबरोबर सकारात्मक चर्चा ■ शेकाप नेते प्रीतम पाटील यांचा पाठींबा**

**। चिरनेर/उरण । प्रतिनिधी ।**

**उरण तालुक्यातील करंजा गावाच्या हद्दीमधील 'करंजा इन्फ्रा' कंपनीत स्थानिकांना काम मिळावे यासाठी सर्वपक्षीय पनवेल-उरण लॉरी चालक-मालक संघटना आक्रमक होऊन त्यांनी कंपनीच्या गेटवर चक्काजाम आंदोलन सुरू केले होते. यावेळी कंपनीने चर्चेसाठी बोलावून सकारात्मक चर्चा करून सोमवारी (दि.२१) कंपनी मालकाबरोबर बैठक बोलविण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे तुर्तास आंदोलन स्थगित करून न्याय मिळाला नाहीतर मंगळवार दि. २२ ऑक्टोबर पासून पुन्हा चक्काजाम आंदोलन उभारण्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष संतोष घरत यांनी कंपनी प्रशासनाला दिला आहे.**





उरण येथील एका बंदरातुन दररोज सुमारे २५० अवजड ट्रकमधून कोळशाची वाहतूक केली जात आहे. या बंदरातील कोळसा वाहतुकीचे काम चाणजे येथील एका स्थानिक ठेकेदाराला दिला आहे. मात्र, कोळसा वाहतुकीचे काम स्थानिक उरण-पनवेल लॉरी चालक-मालक संघटनेलाही विभागुन देण्याची मागणी कंपनी व्यवस्थापन व प्रशासनाकडे केली होती. मात्र, संघटनेच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने ३० सप्टेंबरपासून कोळसा वाहतूक बंद आंदोलनाचा इशारा दिला होता. यानंतर चाणजे येथील स्थानिक ठेकेदारांनीही हद्दीतील प्रकल्पातील कामांवर प्रथम स्थानिक प्रकल्पग्रस्तांचा अधिकार आहे. यानंतरच इतरांना कामे देण्याबाबत विचार केला जाईल, अशी भूमिका घेतली होती. यावर तोडगा काढण्यासाठी उरण पोलिसांनी ३० सप्टेंबर रोजी बैठक बोलावली होती. या बैठकीत सात दिवस आंदोलन स्थगित करण्याची विनंती उरण पोलिसांनी केली होती.

परंतु, या बैठकीत बोलणी फिस्कटल्याने करंजा इन्फ्रा कंपनीच्या गेट समोर मंगळवारी (दि.८) उरण-पनवेल ट्रक चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष संतोष घरत यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय आंदोलन सुरू करण्यात आले होते. या आंदोलनाला शेकाप नेते माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, व शेकापचे जिल्हा खजिनदार प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. तसेच, संघटनेचे उपाध्यक्ष सुहास घरत, माजी अध्यक्ष रघु घरत, सुनील घरत, माजी सभापती नरेश घरत, कामगार नेते रवी घरत, पंडीत घरत, संकेत ठाकूर, सी.जी. घरत, रमाकांत म्हात्रे, बाळू घरत, प्रदिप पाटील, माजी जि.प. सदस्य डॉ. मनिष पाटील, अविनाश म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, भगवान तांडेल, सुरेश पाटील, रुपेश पाटील, अरुण नाईक, सागर म्हात्रे, रोहित चंदणे सह इतर पदाधिकारी, स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी सहभागी झाले होते.

### स्थानिकांना कामे देण्याची मागणी

**उरण-पनवेल ट्रक चालक-मालक संघटनेने मंगळवारी बंदराच्या प्रवेशद्वारावरच ठिय्या मांडून अवजड वाहनांतून होणारी कोळसा वाहतुक रोखुन धरून बंद पाडली होती. यामुळे दोन किलोमीटर अंतरापर्यंत अवजड वाहनांची रांग लागली होती. मात्र, यावेळी बंदराचे प्रतिनिधी म्हणून हसमुख शहा, हरिदास बिराजदार यांनी संघटनेचे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यात सीएसआर फंडातून गावासाठी निधी व स्थानिकांना ८० टक्के कामे देण्याची मागणी करण्यात आली आहे.**

> **"सनदशीर मार्गाने स्थानिकांना न्याय मिळावा. तो जर मिळत नसेल तर आम्ही स्थानिक प्रकल्पग्रस्त ट्रक चालक-मालक संघटनेच्या पाठीशी राहून न्याय मिळवून देऊ."**
> **- प्रीतम म्हात्रे, खजिनदार, शेकाप रायगड**

## उपसरपंचपदी धामणसे यांची नियुक्ती



**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील खांब ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच यांचा निर्धारित कार्यकाल पुर्ण झाल्याने त्या रिक्त झालेल्या जागेवर योगेश धामणसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून अलका बामुगडे यांनी काम पाहिले असून सरपंच कांचन मोहिते, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, मनोज शिर्के, नरेंद्र जाधव, वसंत मरवडे, भाई पोटफोडे, भाऊ पोटफोडे, नितिन जाधव, महेश शिर्के, सागर मोरे, सचिन महाडिक आदींसह सर्व सदस्य व खांब, नडवली, वैजनाथ, घेरासूरगड आदी गावातील ग्रामस्थ व तरूण वर्ग उपस्थित होते.

## वृद्धाश्रमाचे आरोग्य तपासणी शिबीर



**। अलिबाग । वार्ताहर ।**

शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र अलिबाग आणि वाघोली येथील उन्नती सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वाघोली येथे रविवारी (दि.६) आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७३ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून रक्तदान शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले आहे.

शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्राच्या या आरोग्य शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुभाष म्हात्रे व संस्थेच्या सचिव डॉ. प्रतिभा म्हात्रे यांनी रुग्णांची तपासणी करुन त्यांना मोफत औषधोपचार केले. तसेच, डॉ. सुरेश म्हात्रे व डॉ. जगदीश थळे यांनी त्यांना सहकार्य केले. याचवेळी लायन्स हेल्थ फाऊंडेशनतर्फे डोळ्यांची तपासणी करुन ज्यांना मोतीबिंदू आहे, अशा रुग्णांना मोतीबिंदू ऑपरेशनसाठी चोंढी येथे येण्याचे आमंत्रण दिले. डॉ. सूर्यवंशी व डॉ. हुलवान यांनी याकामी सहकार्य केले. या शिबिरात एकूण ७३ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधे देण्यात आली. यावेळी उन्नती सांस्कृतिक मंडळातर्फे २७ स्थानिकांनी रक्तदान केले.

यावेळी ॲड. मनोज पडते, प्रफुल्ल राऊत, चारुशिला कोरडे, गजेंद्र दळी, आर.के. घरत, बळवंत वालेकर, शैलेश केवणे, सरपंच अजिता गावंड-गजने, सुरेश वालेकर, पोलीस पाटील, जयवंत वालेकर, प्रगती शिंगरुत, गोपू वालेकर, विकास केवणे, विष्णू शिर्के, अरुण पाडगे आदी उपस्थित होते.

## संस्थेच्या माध्यमातून नवदुर्गांचा सन्मान



**। उरण । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. समाजातील सर्व क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांना योग्य मानसन्मान व्हावा. त्यांच्या कार्याची इतरांना ओळख व्हावी, महिलांना समाजात पुढे जाण्याची प्रेरणा मिळावी, समाजातील शेवटच्या घटकाला मान सन्मान व न्याय मिळावा. या अनुषंगाने या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी नऊ महिलांचा सन्मान करण्यात येतो. याही वर्षी संस्थेच्या माध्यमातून कोप्रोली चौक येथे नवदुर्गांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी प्रीती नायर (सामाजिक क्षेत्र), डॉ. श्वेता इंगोले (वैद्यकीय क्षेत्र), सीमा भोईर (पत्रकारिता), सरोज म्हात्रे (बचत गट), सुगंधा म्हात्रे (आशा वर्कर), सुगंधा पाटील (स्वच्छता कर्मचारी), ॲड.दीपाली गुरव (न्यायदान क्षेत्र), सुनीता वर्तक (शिक्षण क्षेत्र), कनिष्का नाईक (पोलीस प्रशासन) या नवदुर्गांचा प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## अविनाश आंबेकर यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील गोवे गावातील अविनाश अशोक आंबेकर यांचे रविवारी (दि.६) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४१ वर्षे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन बहिणी, चुलते व मोठा आंबेकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.१५ तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.१८) गोवे येथील त्यांच्या राहत्या निवास्थानी होणार असल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.

## नागाला जेरबंद करण्यात यश

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**



खालापूर तालुक्यातील कुंभीवली गावामध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून ग्रामस्थांच्यात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या नागाला गणेश पाटील यांनी सर्पमित्र अमोल ठकेकर यांना बोलवून जेरबंद केले.

निसर्गाचा ऱ्हास होत असतांना जंगलातील सरपटणाऱ्या मुक्या प्राण्यांनी आपला मोर्चा गावाकडे वळविला असल्याने त्यांच्या जिवाला धोका निर्माण होत चालला आहे. सरपटणारे प्राणी हे रस्ता क्रॉस करीत असतांना अपघाती मृत्यू होत असल्यांचे निदर्शनास येत आहे. काही प्राणी मनुष्य वस्तीत आल्यामुळे त्यांच्या जिवाला तसेच येथे राहणारे ग्रामस्थांच्या जिवाला देखील धोका निर्माण होत आहे. यातच कुंभीवली येथील ग्रामस्थ अनेक दिवस नागाच्या भीतीमुळे भयभीत झाले होते. मात्र, सर्पमित्र ठकेकर यांनी एका घरामधून या नागाला जेरबंद केले असून त्याला जंगालत सोडून दिले आहे.

## आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन

**। उरण । वार्ताहर ।**

उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत तसेच सेबी यांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता या कार्यक्रमांतर्गत शेअर मार्केट कार्यशाळा या कार्यक्रमांचे आयोजन शनिवारी (दि.५) करण्यात आले होते. या कार्यक्रम ंमध्ये महाविद्यालयातील एकूण ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यापैकी ५४ विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यामध्ये यश आले आहे. या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून जगदीश माने यांनी अतिशय उत्तमरित्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र उच्चतंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान केंद्र केंद्राचे प्रमुख यशवंत शितोळे तसेच त्यांच्या संपूर्ण टीमचे महत्वाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राचार्य के. ए. श्यामा यांचे देखील बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले असून सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.



● नेरळ पूर्व येथील हजारे नगर सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा करताना महिला


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.

● **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश,** व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● **अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना** Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१

● **घरकामासाठी बाई पाहिजे** वेळ-सकाळी ८.३० ते १२.३० ठिकाण पंतनगर, अलिबाग संपर्क : ८०९७२०५९३९/९४२२३७२१५४

● **सरकारी मान्यताप्राप्त कंपनीत** सेवानिवृत्त, शिक्षक, डॉक्टर, गृहिणी यांना रोजगाराची संधी. घरातून/कार्यालय (पुर्ण वेळ/अर्ध वेळ) काम. प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जाईल. संपर्क : ९९८७१०१९६०

● **वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर आणि सुपरवाईझर** पाहिजेत शिक्षण १५ वी पास प्रशिक्षण दिले जाईल. ठिकाण बामणसुरे, चोंढी नंबर - ९१४५४५०२९७/९५७९२५८८९२.

● **वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत** १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी नंबर-९१४५४५०२९७/९५७९२५८८९२

● **पोयनाड येथील ब्लॉक विकणेबाबत :** पोयनाड येथील नवीन बिल्डींग हरि ॐ सोसायटी 1st फ्लोअर ब्लॉक, रोडटच ६३० एरिया रेडी पोझीशन विकणे आहे. संपर्क : ९४२२५३४३२०

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


**श्रीवर्धन तालुक्यातील शेतकरी मेटाकुटीला**

# मोकाट जनावरांमुळे भातशेती धोक्यात

**। दिघी । वार्ताहर ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरात मोकाट जनावरांनी हैदोस घातला असून, ही जनावरे शेतातील उभी पिके नष्ट करीत आहेत. मोठ्या कष्टाने पिकविलेल्या अन्नाची नासाडी होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. या जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्याची मागणी येथील संतप्त शेतकऱ्यांनी केली आहे.**



बोर्लीपंचतन शहरासह आजूबाजूच्या गावातील नागरीक मोकाट जनावरांच्या उपद्रवामुळे अगोदरच हैराण असताना आता शेतकरी या जनावरांमुळे त्रस्त झाले आहेत. ही जनावरे दिवसभर शहरात रोडवर तर रात्री शेतातील पिकांचे नुकसान करत आहेत. दिवसेंदिवस या जनावंराची संख्या वाढत आहे. सबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करून देखील गुरांचा बंदोबस्त करण्यात येत नाही.

बोर्लीपंचतन - दिवेआगर रस्त्यालगत असणाऱ्या शेतीमध्ये ही मोकाट जनावरे कळपाने फिरून शेतातील उभे पिक फस्त करीत आहेत. यावर्षी भात पिकांची परिस्थिती चांगली असतानाच, सर्वच पिक हातची जात आहेत. ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतीचे नुकसान झाल्याने उत्साहावर विरजण पडले आहे. असे असतानाही संबंधीत प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असून शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

### बोर्लीपंचतन ग्रामसेवकांकडे निवेदन

**समाधानकारक पावसामुळे भातशेती लोंबीवर आली आहे. अनेक ठिकाणी शेती कापण्यायोग्य झाली आहे. अशा परिस्थितीत मोकाट जनावरे शेतीमध्ये घुसून पिकलेली भातशेती आडवी करत आहेत. शेतकरी सुधाकर कांबळे, संतोष कांबळे व जयवंत कांबळे यांनी बोर्लीपंचतन ग्रामसेवकांकडे या जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.**

# तळा येथे सायबर क्राईम मार्गदर्शन

**तळे :** गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सायबर क्राईम अँड सायबर सिक्युरिटी या विषयावरती वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावरती महाराष्ट्र एटलिजन्स अकॅडमी पुणे येथील पोलीस उपनिरीक्षक संतोष बंगाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. वेबिनारमध्ये सायबर सुरक्षा म्हणजे हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि डेटा यांसारख्या इंटरनेट-कनेक्टेड सिस्टमचे सायबर धोक्यांपासून संरक्षण करते. संगणक, मोबाइल उपकरणे, इलेक्ट्रॉनिक प्रणाली, सर्व्हर नेटवर्क आणि डेटा यांचा समावेश होतो. इंटरनेटचा वापर करत असताना काळजीपूर्वक केला पाहिजे, व्हॉट्सअॅप, फेसबुक, टेलिग्राम, यांचा वापर करत असताना विद्यार्थ्यांनी सुरक्षितता बाळगली पाहिजे याचेही आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली. आताच्या जगात आपण सर्व इंटरनेटचा वापर करतो. त्यामुळे सध्याच्या घडीला सायबरसुरक्षा ही प्रत्येकाची गरज आहे. आरोग्यसेवा, छोटे व्यवसाय, सरकारी संस्था, उत्पादन, वित्तीय संस्था, शिक्षण यांनाही आपला डेटा गोपनीय ठेवण्यासाठी सायबरसुरक्षेची गरज लागते. तसेच ती आपला बँकिंग डेटा सुरक्षित ठेवते. बँकिंग डेटा सुरक्षित नसल्यास कोणीही आपल्या खात्यांमधून पैसे काढू शकते. या विषयावरती सखोल माहिती देण्यात आली.

# बालोद्यान मोजतेय अखेरची घटका

**। पाली । वार्ताहर ।**

काही महिन्यांपूर्वी लहानग्यांनी गजबजलेल्या पालीतील एकमेव बालोद्यानाची प्रचंड दुरवस्था झाली आहे. सद्यस्थितीत हे बालोद्यान अखेरची घटका मोजत असून हे बालोद्यान आहे की गुरांचा गोठा? हे नागरिकांना कळेनासे झाले आहे. त्यामुळे अनेक नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे.

संघर्ष ग्रुप आणि तत्कालीन पाली ग्रामपंचायती मार्फत लहान मुलांची गरज ओळखून येथील रामआळीमध्ये हे बालोद्यान बनविण्यात आले होते. त्यानंतर पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतमध्ये होण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि नगरपंचायतीवर प्रशासकांची नेमणूक झाली. दरम्यानच्या काळात उद्यानाकडे दुर्लक्ष झाले. मात्र नुकतीच नगरपंचायत निवडणूक होऊन नगरपंचायत प्रस्थापित झाली. यावेळी या बालोद्यानाला नवी झळाळी येईल अशी अपेक्षा होती मात्र हे बालोद्यान जैसे थेच आहे.



येथील पाळणे, सी-सॉ, गेट व बाकडे तुटले आहेत. तारेचे कुंपण अनेक ठिकाणी मोडले आहे. त्यामुळे येथे गुरांचे सर्रास वास्तव असते. येथील झाडे व गवत कोमेजून गेले आहे. फरशांची दुरवस्था झाली आहे. आजूबाजूला वाहने पार्क केलेली असतात. अतिक्रमण देखील वाढले आहे. परिणामी लहानग्यांना खेळण्यासाठी हक्काचे ठिकाण नसल्याने त्यांचा हिरमोड होत आहे.

> संघर्ष ग्रुप आणि तत्कालीन ग्रामपंचायतीने मिळून केलेल्या उद्यानाकडे नगरपंचायतचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे लहानग्यांना खेळण्यासाठी हक्काची जागा नाही. नगरपंचायतीने उद्यानाची चांगल्या प्रकारे दुरुस्ती करून नवी झळाळी द्यावी.
>
> – अमित निंबाळकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, पाली


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक


## जाहिरात
## सुपरवायझर पाहिजे

वात्सल्य ट्रस्ट, शिशुगृह अलिबाग येथे पूर्णवेळ महिला सुपरवायझरची आवश्यकता आहे. सदर उमेदवाराचे शिक्षण १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे. सदर उमेदवार ३५ ते ४० वयोगटातील अलिबाग शहर परिसरातील असावी व स्वतःचे दुचाकी वाहन असल्यास प्राधान्य. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व प्रमाणपत्रसह संस्थेच्या कार्यालयात गुरुवार दिनांक १७/१०/२०२४ रोजी दुपारी ठीक १२.००वाजता उपस्थित राहावे. पत्ता. वात्सल्य ट्रस्ट, घर नं १५१०, मयूर बेकरी मागे अलिबाग, रायगड ४०२२०१

# छत्रपती शिवराय हेच आमचे आदर्श

## शिव व्याख्याते प्रमोद काटे यांचे प्रतिपादन

**। उरण । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात बांधकाम किती चांगले होते. यासाठी त्यांनी रायगड आणि इतर किल्ल्यांचे उदाहरण दिले. हिरोजी इंदुलकर यांच्या रायगड बांधणीचे कौतुक केले. घराघरात छत्रपती शिवाजी महाराज जन्माला यावे ही सर्वांची इच्छा आहे. चिरनेर ही ऐतिहासिक भूमी आहे. भारतीय स्वातंत्र्यामधील चिरनेर जंगल सत्याग्रह हा एक सुवर्णक्षण आहे आणि तो कधीही विसरता येणार नाही, असे सांगून हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

चिरनेर येथील अभिनव सामाजिक, सांस्कृतिक मंडळाच्या ३३ व्या नवरात्रोत्सवात छत्रपती शिवराय समजून घेताना या विषयावरील व्याख्यान चिरनेर येथील श्रीराम मंदिर येथे शिवमय वातावरणात संपन्न झाले.

आपल्या देशाला खूप मोठी परंपरा, संस्कृती आहे. इंग्रजांच्या मानसिक गुलामगिरीतुन बाहेर यावे लागेल हे सांगताना मुंबई ही इंग्रजांनी वसवली पण ती येथील स्थानिकांची आहे. तसेच रामायण काळात लक्ष्मणाने बाण मारून मुंबई येथे बाणगंगा उभारले असल्याचे सांगितले. मुंबईमधील भाऊचा धक्का उरण मधील लक्ष्मण हरी चंदेरी यांनी बांधल्याचे सांगितले. अशाप्रकारे विविध घडणाचा उल्लेख केला. काशी येथे काशी विश्वेशर मंदिर आणि अयोध्येत श्रीराम मंदिर व्हावे खुद्द हिंदवी स्वराज्याचे छत्रपती, रयतेचे राजे शिवाजी महाराज यांची इच्छा होती. छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊन स्वातंत्र्याचा लढा लढला गेला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक मंदिरे उभारली. आदर्श घ्यायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा घ्यावा असेही त्यांनी सांगितले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, राजाराम महाराज यांच्या पायदळाचे प्रमुख सुभेदार सरनौबत पिलाजी गोळे यांचे वंशज मनोहर गोळे, महामुंबई चॅनेलचे संपादक मिलिंद खारपाटील, आदर्श शिक्षिका शारदा खारपाटील, चिरनेरचे माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, उपसरपंच सचिन घबाडी, अध्यक्ष सुनील नारंगीकर, विश्वास मोकल भटजी, प्रकाश नारंगीकर, उपकार ठाकूर, गणेश म्हात्रे, रवींद्र भगत, जीवन नारंगीकर यांच्यासह शिवविचार ऐकण्यासाठी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोस्को गुन्ह्यातील आरोपी अटकेत

**पनवेल :** पोस्को गुन्ह्यातील आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी नवनाथ नगर झोपडपट्टी परिसरातून ताब्यात घेतले आहे.या संदर्भात गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुषमा पाटील, पो. हवा.अमोल पाटील, पो. ना.आव्हाड आदींच्या पथकाला अधिक तपासामध्ये सदर गुन्ह्यातील आरोपी फैय्याज शेख हा नवनाथ नगर झोपडपट्टी परिसरात येणार असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाल्याने सदर पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले आहे.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

### रोजगार सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) **रोजगार सूचना क्र.सीओ/पी-आर/01/2024, दिनांक 16.08.2024** जारी केले आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 07.10.2024 होती. **आता अर्ज भरण्याची शेवटची तारीख 21.10.2024 पर्यंत वाढविण्यात आली आहे**.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

## JOB OFFER

We are hiring a Full-Time Electrical Engineer for our construction project at **Bhaliwadi**, Tal – Karjat, Dist - Raigad.

* Should have a minimum of 5 years of experience working at projects.
* Should have knowledge of transformer sub-station, primary fault finding in control panels, connecting pumps-motors, light fittings, etc.
* Should be able to give daily work reports and handle a few juniors under him.

Salary to be given based on work experience. Interested candidates can send their resume on: **info@antava.in**
Place:Karjat
Date: 10/10/2024

# अल्पवयीन मोबाईल चोरांना अटक

**पनवेल :** करंजाडे वसाहत परिसरातून महागडे सहा मोबाईल चोरणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. करंजाडे वसाहत परिसरात गेल्या काही दिवसापासून मोबाईल चोरीचे प्रकार वाढले होते. या संदर्भात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनि प्रकाश पवार, पो.हवा.महेश पाटील, अमोल पाटील, अमोल डोईफोडे, संदेश म्हात्रे, पो.शि.विशाल दुधे, नितीन कराडे आदींचे पथक तांत्रिक तपासाद्वारे व गुप्त बातमीदाराद्वारे माहिती घेत असताना त्यांना करंजाडे परिसरातील दोन अल्पवयीन मुलांसंदर्भात माहिती मिळाली. त्यानुसार या दोन मुलांना ताब्यात घेवून अधिक तपासामध्ये त्यांनी चोरलेले सहा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत.

# उरणमध्ये गडगडाटासह पाऊस

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

बऱ्याच दिवसापासून विश्रांती घेतलेल्या, हस्त नक्षत्राच्या पावसाने बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास विजेच्या गडगडाटासह हजेरी लावल्याने, या अचानक आलेल्या पावसामुळे भात खाचरातील भातपिके शेतात साचलेल्या गुडघाभर पाण्यात आडवी झाली आहेत. त्यामुळे उरण तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच सर्वत्र सुरू असलेल्या नवरात्र उत्सवात पावसाचा व्यत्यय ठरत असून गरबा प्रेमींमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

सध्या या भागात बऱ्याच ठिकाणी भातशेती कापणीचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे कोठे कापणी सुरू आहे. तर कुठे भाताची मळणी सुरू आहे. तर आदिवासी वाड्यांमध्ये नाचणी, वरी या पिकांची कापणी सुरू आहे. मात्र आज अचानक आलेल्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून शेतकरी वर्ग चिंतेत आहे. या भागात बऱ्याच ठिकाणच्या भात खाचरातील भाताचे पीक पूर्णपणे तयार झाले आहे. तर काही ठिकाणी भातपिके दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. ज्या भात खाचरात भात पिके तयार झाली आहेत. अशी पिके शेतकऱ्यांनी कापून शेतात सुकवायला ठेवली आहेत. तर काही ठिकाणी भाताची मळणी सुरू आहे. परंतु अचानक हस्त नक्षत्राच्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने भातपिके शेतात भिजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून, शेतकरी वर्ग चिंतेत आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, आम्ही **(१) प्रतिभा धनाजी पाटील, (२) अजय जनार्दन म्हात्रे, (३) रमाकांत दत्तात्रय पाटील, (४) उज्वला जयवंत बायकर, (५) आशा राजेंद्र ठाकूर, (६) प्रगती दीपक साबळे, (७) इंदिरा मोतीराम पाटील, (८) ताराबाई भानुदास घरत, (९) विमल कमलाकर म्हात्रे, (१०) स्मित प्रेमनाथ पाटील आणि (११) आरुषी प्रेमनाथ पाटील (१०) आणि (११) त्यांचे अज्ञान पालनकर्ता रमाकांत दत्तात्रय पाटील यांच्यामार्फत,** यांच्या खालील **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मौजे बेलपाडा (आधी कवाडे गावामध्ये समावेश होता), तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथील गट क्र. २५० जुना गट क्र. २०७ ब (आधीचा सर्व्हे क्र. ७४/२) शी संबंधित गट क्र. २५१ मधील जमीन (जुना गट क्र. २०७अ आणि आधीचा सर्व्हे क्र. ७४/१) आता एकत्रित करण्यात आलेली आहे, क्षेत्रफळ ३७-००-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच ९.१४ एकरच्या समतुल्य किंवा त्याच्या आसपासच्या शेती जमिनीचा भाग असणाऱ्या ०१-३५-६० (हेक्टर-आर-चौरस मीटर) क्षेत्राच्या (यात यानंतर **'मालमत्ता'** असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील अविभाजित शेअर, अधिकार, हक्क आणि हितसंबंध यांची चौकशी करीत आहोत.

कोणत्याही व्यक्ती/संस्था यांना सदर मालमत्तेतील किंवा त्यातील कोणत्याही भागातील कोणत्याही स्वरूपाची विक्री,सामंजस्य ज्ञापन, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, आकार, भार, भाडेदारी, पोट-भाडेदारी, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, गहाण, (समन्याय किंवा अन्यथा), वारसा, भोगवटा, कब्जा, विभाजन, शेअर, बक्षीस, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, निर्गम, विकास अधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, प्रसंविदा किंवा अट, सुविधाधिकार, अधित्याग, अधित्यजन, किंवा कोणत्याही पद्धतीने कोणताही करारनामा, करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, विवाद, कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण, महसूल किंवा संविधिमान्य प्राधिकरण किंवा लवाद यांनी संमत केलेला हुकूमनामा किंवा आदेश किंवा निवाडा याद्वारे किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही हिस्सा, अधिकार, हक्क, इस्टेट, हितसंबंध, दावा, आक्षेप, आणि/ किंवा मागणी (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ) असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०००१३ येथे आणि तसेच monika.bhonsale@trilegal.com आणि uday.shah@trilegal.com या इ-मेल वर या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्यातील दस्तावेजी पुराव्याच्या पूर्ण आणि प्रमाणित केलेल्या सत्य प्रतींसह लेखी स्वरूपामध्ये सूचित करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा कोणताही दावा किंवा कोणतेही दावे, जर काही असतील तर, त्यांचा अधित्याग आणि/ किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**वरील संदर्भित परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे बेलपाडा (आधी कवाडे गावामध्ये समावेश होता), तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथील गट क्र. २५० जुना गट क्र. २०७ ब (आधीचा सर्व्हे क्र. ७४/२) शी संबंधित गट क्र. २५१ मधील जमीन (जुना गट क्र. २०७अ आणि आधीचा सर्व्हे क्र. ७४/१) आता एकत्रित करण्यात आलेली आहे, क्षेत्रफळ ३७-००-०० (हेक्टर-आर-चौरस मीटर) म्हणजेच ९.१४ एकरच्या समतुल्य किंवा त्याच्या आसपास च्या शेती जमिनीचा भाग असणाऱ्या ०१-३५-६० (हेक्टर-आर-चौरस मीटर) क्षेत्रामधील अविभाजित शेअर, अधिकार, हक्क आणि हितसंबंध आणि सदर मालमत्ता खालील प्रमाणे सीमित आहे :

पूर्व दिशेकडे : गट क्र. २५८ आणि गट क्र. २५९;
पश्चिम दिशेकडे : गट क्र. १६;
दक्षिण दिशेकडे : गट क्र. २५०/२;
उत्तर दिशेकडे : गट क्र. १५;

**आज दिनांक १० ऑक्टोबर, २०२४**

**मोनिका भोसले**
**भागिदार**
**ट्रायलिगल**
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३

## पनवेल महानगरपालिका
**ता.पनवेल, जि. रायगड**

कार्यालय :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्यासमोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल ४१०२०६
दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/उद्यान/६५२४/प्र.क्र.५७/८५३/२०२४
दिनांक:-०८-१०-२०२४

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजे सेक्टर १५ प्लॉट क्र. ०६ येथे उद्यान विकसित करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर बाबतच्या तांत्रिक बाबी व त्यांचा तपशील panvelcorporation.com वर खाली दिलेल्या मुदतीपर्यंत उपलब्ध राहील.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजे सेक्टर १५ प्लॉट क्र. ०६ येथे उद्यान विकसित करणे. | दि.०९-१०-२०२४ ते दि.१४-१०-२०२४ दु.१२.०० वाजेपर्यंत (०७ दिवस) |

१) दरपत्रके दि. १४-१०-२०२४ रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात अथवा panvelcorporation.swm@gmail.com वर स्वीकारण्यात येतील.
२) अटी व शर्ती युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**उपआयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-नागेवाडी, तालुका-कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| शैलेश रघुविर कर्नाड | ३३ | ४ | २-२४-०० पो.ख ०-३१-०० एकूण २-५५-०० यापैकी २-१५-०० गुंठे क्षेत्राचे | १-५६ |
| शैलेश रघुविर कर्नाड | ३६ | १३ | ०-१७-०० पो.ख ०-०६-०० एकुण ०-२३-०० | ०-०९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द् झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०९/१०/२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी, मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-बामणगाव, ता. अलिबाग, येथील गट नंबर २६३ एकूण क्षेत्रा ०-१९-०० हे. आर., आकार ४.२७ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीच्या विद्यमान मालक मनिषा रमेश भगत व दिलीप सखाराम थळे मु. बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/१०/२०२४

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | प्लॉट नं | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. अरुण रामकृष्ण उर्फ बाळकृष्ण पाटील | ८९/२७/अ | १२ | २-४२-०० | २४ | २० |
| २)पराग रामचंद्र केळकर ३)पल्लवी रामचंद्र केळकर | ८९/२७/अ | १६ | २-८३-०० | २८ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**अॅड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : १०/१०/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी **मौजे मुद्रे बुद्रुक,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक **ओमसाई किर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.** यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०/१/ब/८ | ०२-४५.३५ | ०४-९० |
| १०/१/ब/९ | ०२-४५.३५ | ०४-९० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०८ ऑक्टोबर २०२४

**अॅड.शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-टेकाळी. अलिबाग, येथील गट नंबर २५, एकूण क्षेत्रा ०-९३-१० हे. आर., आकार १९.८१ रू. पै. ही मिळकत, या मिळकतीच्या विद्यमान मालक आरती रामकृष्णन यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/१०/२०२४

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव
**ग. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४**

जावक क्र.१६०९
दिनांक :- ०९-१०-२०२४

### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत नागाव, ता.अलिबाग, जि.रायगडकडून ग्रामनिधी/१५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य पुरविठेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

| अ.क्र | निधीचा स्त्रोत | अंदाजित रक्कम | कामाचे नाव | काम पूर्ण करण्यापूर्वी मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त | ३८७९५/- | महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर | ३ महिने |
| २ | १५ वा वित्त | ५०,०००/- | युवक युवतीसाठी कौशल्यवृद्धी प्रशिक्षण आयोजित करणे. | ३ महिने |
| ३ | १५ वा वित्त | १,५४,१००/- | महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करणे. | ६ महिने |
| ४ | १५ वा वित्त | १,००,०००/- | अंगणवाडी विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरविणे | ६ महिने |
| ५ | १५ वा वित्त | ३१,५६०/- | अंगणवाडी साठी शालेय साहित्य करणे. | ६ महिने |
| ६ | १५ वा वित्त | ८५,०००/- | मच्छर धूर फवारणी औषध खरेदी व फवारणी करणे | ६ महिने |
| ७ | १५ वा वित्त आयोग | दरपत्रकाप्रमाणे | टीसीएल खरेदी करणे | ६ महिने |
| ८ | १५ वा वित्त आयोग | दरपत्रकाप्रमाणे | मेडीक्लोर खरेदी करणे | ६ महिने |

१) निविदे/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.१०/१०/२०२४ ते १४/१०/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) कोणत्याही नामंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठल्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/ दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/ दरपत्रके दि.१४/१०/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**सही/-**
**सौ. श्वेता संजय कदम**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव ता. अलिबाग, जि. रायगड**

**सही/-**
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

# महाराष्ट्रातील गोविंदांचा अटकेपार झेंडा

## स्पेनमध्ये कॉनकुर इंटरनॅशनल्स २०२४ स्पर्धेत विजयी सलामी

**। स्पेन । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्रातील गोविंदांचा संघ स्पेनमध्ये कॉनकुर इंटरनॅशनल्स २०२४ स्पर्धेत विजयी झाला. ही स्पर्धा मानवी मनोरे बांधण्याच्या कलेतील प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धांपैकी एक आहे. स्वित्झर्लंड, डेन्मार्क, फ्रान्स, नॉर्वे आणि अँडोरा यांसारख्या विविध देशांतील १२ संघांचा समावेश होता. या विजयामुळे महाराष्ट्र आणि भारताचे नाव जागतिक पातळीवर गाजले.



पुर्वेश सरनाईक आणि महाराष्ट्रातील शिष्टमंडळाने स्पेनमधील डेल पेनडेस विला फ्रांकाफ येथे प्रसिद्ध कॉनकुर फेस्टिवलला भेट दिली. हा सण मुंबई आणि ठाण्यात साजऱ्या होणाऱ्या दहीहंडी उत्सवाशी सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित आहे. यामध्ये मानवी मनोरे सादर करण्यात येतात. यावेळी, महाराष्ट्राच्या संघाला कॅस्टेलर्स विला फ्रांकाफ या जगातील सर्वात यशस्वी मानवी मनोरे बांधणाऱ्या संघासोबत सहयोग करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमात दोन्ही संघांनी एकत्रित मनोरे बांधण्याचा सराव केला आणि एकमेकांच्या मानवी मनोरे उभारणाच्या कौशल्याचे आदान-प्रदान केले. या भेटीत विला फ्रांका शहराचे महापौर यांनी पुर्वेश सरनाईक आणि भारतीय शिष्टमंडळाचे सन्माननीय पाहुणे म्हणून स्वागत केले. या संपूर्ण दौऱ्याचे आयोजन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य दहीहंडी संघटनेचे अध्यक्ष सुरेंद्र पांचाळ, अभिषेक सूर्वे आणि गीता झगडे यांच्या नेतृत्वाखाली उत्तमरीत्या पार पडले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे भारताचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सशक्त प्रतिनिधित्व करण्यास यश मिळाले. पुर्वेश सरनाईक आणि भारतीय संघाने 'कॅस्टेलर्स विला फ्रांका' संघाचे अध्यक्ष अर्नेस्ट गॅलर्ट, माजी अध्यक्ष मिकेल फेरट आणि माजी संघ कर्णधार टोनी बाख यांचे आभार मानले. या सहयोगामुळे भारत आणि स्पेन यांच्यातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ झाले असून, मानवी मनोरे बांधण्याच्या या कलेचे तांत्रिकदृष्ट्या आदान-प्रदान करण्यास फायदा होईल, असा विश्वास पुर्वेश सरनाईक यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या ऐतिहासिक दौऱ्यामुळे महाराष्ट्राचे गोविंदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कर्तबगारी सिद्ध करू शकले. यामुळे दोन्ही राष्ट्रांतील सांस्कृतिक बंध दृढ झाले आणि महाराष्ट्राच्या गोविंदांनी जागतिक स्तरावर एकता, सामर्थ्य आणि जिद्दीचे प्रदर्शन केले.

# शारदा मंदिर शाळेच्या ११ खेळाडूंची नॅशनल स्पर्धेत निवड

**। कर्जत । वार्ताहर ।**

दादर परेल येथे झालेल्या ओपन महाराष्ट्र स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत कर्जतमधील शारदा विद्या मंदिरच्या अकरा खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या सर्व खेळाडूंनी सुवर्णपदक आणि रौप्यपदक आणि कांस्यपदकाची कमाई केली. मुंबई येथे होणाऱ्या तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत निवड झाली आहे. शारदा विद्या मंदिरच्या खेळाडूंनी यश प्राप्त करून स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल केले असून या यशस्वी खेळाडूंच्या यशामुळेच रायगड जिल्ह्याला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरवले आहे.



या यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष व सुनिल सावंत यांनी कौतुक करून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याचे जाहीर करुन शुभेच्छा दिल्या. या यशस्वी खेळाडूंच्या यशामागे शारदा विद्या मंदिर शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक सौरभ गुरव यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे.

प्रेम देशमुख-सुवर्ण, विहान पेरनेकर-सुवर्ण, सोहम विटकर-सुवर्ण, विनंती खडके-रौप्य, माही चौहान-रौप्य, मयूर जाधव-रौप्य, हिमांशू शिंदे-रौप्य, श्रावणी काळबडे-कांस्य, दक्ष नागावकर-कांस्य, कार्तिकी सरोदे-कांस्य, कबीर गायकवाड-कांस्य रायगड जिल्हा सचिव स्वप्नील अडुरकर व मोहिनी अडुरकर यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षक वृंद यांनी शुभेच्या दिल्या.

### मुंबई विभाग शालेय कबड्डी स्पर्धा

# रानपाखर आश्रमशाळा अंतिम विजेता

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मुंबई विभाग शालेय कबड्डी स्पर्धेत पेण वरप येथील रानपाखर आश्रमशाळेने मुंबई उपनगर संघाचा २४ गुणांनी पराभव करुन विजेतेपद पटकावले. सदर संघ राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र ठरला आहे. या स्पर्धा क्रीडा युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद पालघरद्वारा आयोजित केल्या होत्या.



मुंबई विभागीय १४ वर्षा खालील मुले व मुलींच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन पालघर येथील राजगुरू ह. म. पंडित विद्यालय सफाळे, पालघर येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेत एकूण मुंबई विभागातील १६ संघानी सहभाग घेतला होता. त्यात १४ वर्षा खालील मुलांच्या गटात पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या रानपाखरं आश्रमशाळा वरप ता पेण, जि.रायगड या संघाने रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करताना उपउपांत्य फेरीत भिवंडी संघाचा पराभव केला. तर उपांत्य फेरीत स्थानिक पालघर संघाचा पराभव करून अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात मुंबई उपनगर संघाचा सहज २४ गुणांनी पराभव करून अंतिम विजेतेपद पटकावले. सदर संघ राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र ठरला आहे. त्या बद्दल सर्व स्तरातून सहभागी खेळाडू विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक,मुख्याध्यापक संजय नाईक यांचे कौतुक होत आहे. संस्थेच्या विश्वस्त खासदार सुप्रिया सुळे यांनी खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले आहे.

# सचिन-लारा हे दिग्गज पुन्हा एकदा मैदानात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बहुप्रतिक्षित इंटरनॅशनल मास्टर्स लीग (आयएमएल २०२४) संपूर्ण जगाला तुफान घेरण्यासाठी सज्ज आहे. या लीगमधील संघांची नावे आणि त्यांच्या कर्णधारांची घोषणा करण्यात आली आहे. भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजचे संघ सहभागी होणार आहेत. या संघांमध्ये सचिन तेंडुलकर भारताचे नेतृत्व करणार आहे. तर ब्रायन लारा वेस्ट इंडिज संघाचे नेतृत्व करणार आहे. या लीगचा पहिला हंगाम १७ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू होईल आणि ८ डिसेंबर २०२४ पर्यंत चालेल.



## इंटरनॅशनल मास्टर्स लीगला १७ नोव्हेंबरपासून सुरुवात

या लीगच्या पहिल्या सत्रात सुरुवातीला नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ४ सामने आयोजित केले जातील. या लीगचा पहिला सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात १७ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. ज्यामध्ये सचिन तेंडुलकर आणि कुमार संगकारा आमनेसामने असतील. दुसऱ्या सामन्यात शेन वॉटसनच्या ऑस्ट्रेलियाचा सामना जॅक कॅलिसच्या दक्षिण आफ्रिकेशी होईल आणि त्यानंतर श्रीलंकेचा सामना आयोन मॉर्गनच्या नेतृत्वाखालील इंग्लंडशी होईल. त्यानंतर ब्रायन लारा आणि त्याचा वेस्ट इंडिज संघ ऑस्ट्रेलियाचा सामना करण्यासाठी मैदानात उतरेल.

### आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीगमध्ये भाग घेणारे संघ आणि त्यांचे कर्णधार

भारत : सचिन तेंडुलकर
श्रीलंका : कुमार संगकारा
इंग्लंड : आयोन मॉर्गन
वेस्ट इंडिज : ब्रायन लारा
ऑस्ट्रेलिया : शेन वॉटसन
दक्षिण आफ्रिका : जॅक कॅलिस

नवी मुंबईतील ४ सामने पूर्ण झाल्यानंतर लीगच्या दुसऱ्या टप्प्यातील सामने २१ नोव्हेंबरपासून लखनौच्या एकना स्टेडियमवर खेळवले जातील. २१ नोव्हेंबरला लखनौमध्ये भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. लखनौमध्ये एकूण ६ सामने खेळवले जातील. त्यानंतर लीगचा तिसरा टप्पा रायपूरमध्ये खेळवला जाईल. या लीगचे ८ सामने रायपूरमध्ये आयोजित केले जातील. ज्यात उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीचा समावेश आहे. ८ डिसेंबर रोजी अंतिम सामना खेळला जाईल

लीगमध्ये उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसह एकूण १८ सामने आयोजित केले जातील आणि त्यामध्ये माजी दिग्गजांना पुन्हा एकदा खेळताना पाहणे हा एक वेगळा अनुभव असेल.

# शान मसूदने १५२४ दिवसांचा दुष्काळ संपवला

## दुसरे जलद शतक झळकावले

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात झाली आहे. पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदचे वेगळे रूप मुलतान स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या पहिल्या सामन्यात पाहायला मिळाले, जिथे त्याने आपल्या संघाचे नेतृत्व करताना कारकिर्दीतील सर्वात जलद शतक झळकावले. या सामन्यात पाकिस्तान संघाची सुरुवात खराब झाली होती, गस ॲटकिन्सनने सॅम अयुबला लवकरच पॅव्हेलियनमध्ये पाठवले होत. परंतु यानंतर मसूदने अब्दुल्ला शफीकच्या साथीने डाव सांभाळला आणि दुसऱ्या विकेटसाठी २०० हून अधिक धावांची भागीदारी केली.

या शतकासह त्याने बांगलादेशविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका गमावल्यानंतर टीका करणाऱ्या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. कर्णधार शान मसूदने १०२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हे त्याच्या कारकिर्दीतील हे पाचवे शतक आहे. मसूदच्या खेळीत दहा चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. १५२४ दिवसांनंतर मसूदचे हे पहिले शतक आहे. विशेष म्हणजे त्याने शेवटचे शतकही इंग्लंडविरुद्धच झळकावले होते. जे त्याने २०२० मध्ये मँचेस्टरमध्ये झळकावले होते. मसूदने आतापर्यंत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. कारण तो बराच काळ पाकिस्तान संघातून आत-बाहेर झाला होता. दरम्यान, आता त्याला कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारीही स्वीकारावी लागली आहे.



शान मसूदने इंग्लंडला सुरुवातीच्या विकेट्सचा फायदा घेऊ दिला नाही. त्याने खेळपट्टीवर तळ ठोकत मैदानाच्या चारही दिशेला फटकेबाजी करत धावा केल्या. शानने या शतकासह इतिहास लिहिला आहे. तो पाकिस्तानसाठी मिसबाह उल हकनंतर सर्वात वेगवान शतक झळकावणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. मिसबाह उल हकने २०१४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५६ चेंडूत शतक झळकावले होते. शान मसूदने आता पाकिस्तानचा कर्णधार म्हणून दुसरे जलद शतक झळकावण्याचा विक्रमही आपल्या नावावर केला आहे. या यादीत मिसबाह पहिल्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे, जेव्हा मिसबाहने कसोटी क्रिकेटमध्ये संयुक्त सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला तेव्हा त्याने महान क्रिकेटपटू व्हिव्ह रिचर्ड्सच्या विक्रमाची बरोबरी केली होती. सामन्याबद्दल बोलायचे तर पाकिस्तान नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसरार पाकिस्तान संघाने पहिल्या डावात ७४ षटकानंतर ३ बाद २९८ धावा केल्या आहेत. कर्णधार शान मसूदने दीडशतक झळकावून बाद झाला. त्याने १७७ चेंडूचा सामना करताना १३ चौकार आणि २ षटकाराच्या मदतीने १५१ धावांचे योगदान दिले. अब्दुल्ला शफीक आणि शान मसूद यांची २५३ धावांची भागीदारी ॲटकिन्सनने मोडली. शफीकने १८४ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १०२ धावांची खेळी साकारली होती.

# विभागीय कराटे स्पर्धेत आरोही सोनवणे चमकली

**। पाली । वार्ताहर ।**

जपान कराटे असोसिएशन इंडियाच्यावतीने विभागीय स्तरावर कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज शाहू स्टेडियम येथे नुकतीच घेण्यात आली. या विभागीय स्पर्धेत माणगाव तालुक्यातील विळे या छोट्या गावातील आरोही दीपक सोनवणे या इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या मुलीने रायगड जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. आरोही दीपक सोनवणे हि कुंडलिका प्री-प्रायमरी इंग्लिश स्कुल विळे येथे शिकत आहे. तिच्या या यशाबद्दल तिच्यावर सर्व स्थरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. अतिशय लहान वयात कराटे स्पर्धेत आरोहीने मिळविलेले यश कौतुकास्पद आहे.



तिला मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कराटे स्पर्धेत रायगड, सातारा, नांदेड, पुणे, कराड, धुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत यश मिळाल्याने आरोहीचा आत्मविश्वास वाढला आहे.

# सायक्लोथॉन रॅलीद्वारे आरोग्य आणि पर्यावरणाचा संदेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

येथील अलिबाग लायन्स क्लब आणि अलिबाग नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने भव्य सायक्लोथॉनचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते उद्घाटन, तर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांच्या हस्ते सहभागी सायकलस्वारांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. माझी वसुंधरा मोहिमेअंतर्गत सदर उपक्रमाचा मुख्य उद्देश आरोग्य आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देऊन जनजागृती करणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. पंचेचाळीस, तीस आणि सोळा किलोमीटर अंतराच्या तीन गटाच्या या रॅलीमध्ये कोणत्याही प्रकारची स्पर्धा न ठेवता सहभागी होण्यावर भर दिला गेला. सहभाग घेऊन रॅली पूर्ण करणाऱ्या तिन्ही गटातील एकूण तीनशे सव्वीस सायकलस्वारांना सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.



उद्घाटनप्रसंगी बोलताना रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सायकलचा आरोग्य आणि पर्यावरणाशी सहसंबंध सांगून लायन्स अलिबागच्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी पर्यावरण रक्षणासाठी बांबूची लागवड अतिशय महत्त्वाची असल्याचे सांगताना, शोभेच्या वस्तू, उपजीविकेचे साधन, धूपप्रतिबंध, निसर्गाचा समतोल राखण्यात मोलाचे योगदान असणाऱ्या बांबूची लागवड लायन्स क्लब अलिबागने मोठ्या प्रमाणावर करावी, असे सूचवले. ही वनस्पती गवतवर्गीय असल्याने, तोडणीसाठी विशेष परवानगीची आवश्यकता नसल्याचे सांगितले.

# सचिन तेंडुलकर बँक ऑफ बरोडाचा ग्लोबल ब्रँड अँबेसडर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बँक ऑफ बरोडाच्या ग्लोबल ब्रँड अँबेसेडरपदी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याची नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेने क्रिकेटपटूला दुसऱ्यांदा ब्रँड अँबेसडर बनवलं आहे. यापूर्वी २००५ मध्ये राहुल द्रविड हा बँकेचा ब्रँड अँबेसडर होता. त्यानंतर आता मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याला ग्लोबल ब्रँड अँबेसडर म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. बँक ऑफ बरोडाचे १७ देशांमध्ये अस्तित्व आहे. त्यामुळे सचिन तेंडुलकरची आंतरराष्ट्रीय छबी पाहता जागतिक स्तरावर ब्रँडिंगसाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असं बँक अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे. ऑलिम्पियन पीव्ही सिंधू, भारतीय महिला क्रिकेटपटू शफाली वर्मा आणि टेनिसपटू सुमित नागपाल हे देखील बँकेच्या विविध मोहिमांमध्ये योगदान देत आहेत.




सचिन तेंडुलकर हे मोठं नाव आहे. त्याला जगाच्या कानाकोपऱ्यात ओळखलं जातं. तो भारताच्या विविध गटांचे प्रतिनिधित्व देखील करतो. त्याची लोकप्रियता पाहता बँक ऑफ बरोडाला जागतिक पातळीवर नक्कीच चालना मिळेल.

### बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात केली कामगिरी

# हार्दिकने मोडला विराटचा 'हा' खास विक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा बांगलादेश विरुद्धचा सामना ग्वाल्हेर येथे झाला. पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेशचा भारताने ७ गडी राखून पराभव केला. यासह टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. हा सामना जिंकत भारताने चांगली कामगिरी तर दाखवली. पण, त्याशिवायदेखील एक मोठी गोष्ट झाली आहे. ती म्हणजे हार्दिक पंड्याने विराट कोहलीचा एक खास विक्रम मोडला आहे. तो म्हणजे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विजयी षटकार ठोकणारा भारतीय खेळाडू तो बनला आहे. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना भारताला विजयासाठी १२८ धावांचे लक्ष्य दिले होते. जे टीम इंडियाने ११.५ षटकांत ३ गडी गमावून सहज गाठले. भारतासाठी वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, हार्दिक पांड्या आणि नितीश रेड्डी यांनी चमकदार कामगिरी केली. या खेळाडूंमुळेच टीम इंडिया विजयाची नोंद करण्यात यशस्वी ठरली. विराट कोहलीने तो विक्रम करताना टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४ वेळा षटकार मारून सामना जिंकून दिला होता. तर, आता टीम इंडियाकडून हार्दिक पंड्याने १६ चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांसह ३९ धावा केल्या. त्याने तस्किन अहमदच्या षटकात षटकार मारून टीम इंडियाला विजय मिळवून दिला. हार्दिकने आतापर्यंत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५ वेळा षटकार मारून टीम इंडियाला विजय मिळवून दिला आहे. या यादीत महेंद्रसिंग धोनी आणि ऋषभ पंत यांचाही समावेश आहे. या दोन्ही खेळाडूंनी प्रत्येकी तीन वेळा षटकार मारूनटी-२०सामनाजिंकूनदिलाआहे.



टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विजयी षटकार ठोकणारे भारतीय खेळाडू : हार्दिक पंड्या- ५ षटकार, विराट कोहली- ४ षटकार, एमएस धोनी- ३ षटकार, ऋषभ पंत- ३ षटकार, शिवम दुबे- १ षटकार दरम्यान, हार्दिक पंड्या २०२४ च्या टी-२० विश्वचषकाचा सदस्य आहे. २०१६ मध्ये पदार्पण केले होते. तेव्हापासून त्याने एकूण १०३ टी-२० सामन्यांत ८७ विकेट्स घेतल्या. याशिवाय १५६२ धावाही केल्या. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ८४ आणि कसोटीत १७ विकेट्स आहेत.

### मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा

# महात्मा फुले महाविद्यालयाचा संघ ठरला सुवर्णपदकाचा मानकरी

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या मुंबई झोन क्र. १ च्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. रश्मी पाटील, रुपाली जाधव, ममता चव्हाण, पायल निगडे, अंकिता घारे, दीपिका गड्डे, तनिषा मोरे, एकता पाटील, विनंती चव्हाण, अमृता कदम, मानसी पाटील, शांभवी मोरे अशा बारा खेळाडूंचा या संघात समावेश होता.



विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलींच्या या संघातील रश्मी पाटील, रूपाली जाधव, ममता चव्हाण व पायल निगडे या चार खेळाडू मुंबई विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी पात्र ठरल्या. कब्बडी खेळातील मुलींच्या संघाने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)